# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००५ |
| वर्ष | : | सहावे |
| अंक | : | ९ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ९६**



वर्ष सहावे/अंक ९ / ऑगस्ट २००५

# संपादकीय

## कृतज्ञता दिन

१ ऑगस्ट रोजी 'विद्या प्रसारक मंडळ' ७१व्या वर्षात पदार्पण करीत आहे. शालेय शिक्षणापासून ते पदव्युत्तर शिक्षणा पर्यंतची सोय विद्या प्रसारक मंडळाने ठाण्यात उपलब्ध करून दिली. या सर्व शैक्षणिक संस्थांची आपली आपली अशी स्वतंत्र परंपरा निर्माण झाली. अनेक शिक्षक, प्राध्यापक यांच्या कष्टांतून विद्या प्रसाराचे काम मातृसंस्था विद्या प्रसारक मंडळ करते.

यापुढील काळातही नव्याने विकसित होणाऱ्या ज्ञानशाखांच्या शिक्षणाची सोय काळाच्या गरजेनुसार उपलब्ध करून देण्यासाठी विद्या प्रसारक मंडळाची आपली हेतूपूर्ण वाटचाल चालू आहे. १ ऑगस्ट हा आमचे प्रेरणास्थान डॉ. वा. ना. बेडेकर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमाबद्दल, शिक्षक, प्राध्यापकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. तदवतच भविष्याच्या हाकांचा अंदाज घेण्याचा दिवस आहे. आजवर आम्ही काय साधले याचा शोध घेण्याबरोबरच आम्हाला आणखी काय करायचे आहे, त्या दृष्टीने आणखीन काय करावयास हवे यांच्या चिंतनाचा आहे.

लोकमान्यांच्या स्मृतिदिनाचा हा दिवस आहे. विद्या प्रसारक मंडळाच्या वाटचालीत त्यांच्या सारख्या महान राष्ट्र भक्ताची, त्यांच्या सारख्या शिक्षण तज्ज्ञाच्या विचारांची प्रेरणा आम्हाला कायम मिळत राहिली आहे. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !

विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये एवढीच माझी इच्छा.
दु:खतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस अशी माझी अपेक्षा नाही,
दु:खावर जय मिळवता यावा एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच माझी इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंसं, मला तारावसं ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सात्वन केलं नाहीस तरी माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये
एवढीच माझी इच्छा



**- गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर**

# दिशा

## वर्ष सहावे / अंक ९/ ऑगस्ट २००५



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठ

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १० वे / अंक २रा)



**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org



**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@vsnl.net


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | सत्कार मूर्ती - श्री. माधवराव तथा मा. ना. पाटील | | ३ |
| २) | सत्कार मूर्ती - श्री. विठ्ठल गणेश काळे | | ५ |
| ३) | मूर्ती आणि मूर्तिपूजा | शं. बा. मठ | ७ |
| ४) | वरेरकरांच्या नाटकातील 'स्त्री दर्शन ' | डॉ. र. म. शेजवलकर | ११ |
| ५) | कथेची कथा - लेखांक १ | प्रा. मोहन पाठक | १७ |
| ६) | 'भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधने- ५ | यशवंत साने | २५ |
| ७) | ग्रंथ, ग्रंथालय, ग्रंथसंस्कृती | प्रा. मोहन पाठक | ३३ |
| ८) | सुमेरु प्रकाशनाची दोन दर्जेदार पुस्तके | शरद जोशी | ३६ |
| ९) | '... आणि धरणीकंप होत राहिला ' | शरद जोशी | ३८ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३९ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७० वर्षांहून अधिक काळ शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व संगणक अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची व्यवस्था संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून संस्था विविध उपक्रम राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धात उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रात कार्यप्रवण आहेत.

आज टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. उद्याचे नागरिक बनणाऱ्या संस्कारक्षम विद्यार्थ्यांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**आपण या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा

**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.**

दूरध्वनी : २५४२ ६२७०

टीप : वर्गणीजाहिरात वा देणगीची रक्कम चेकने पाठवावी. धनादेश (चेक) **''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा''** या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

सदर अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी कळवावा.

सत्कार मूर्ती

# श्री. माधवराव तथा मा. ना. पाटील

*वर्धापनदिनाच्या सत्कारमूर्ती माननीय मा. ना. पाटील व व्ही. जी. काळे यांच्या वाटचालीबद्दल त्यांनी दिलेली माहिती त्रोटक स्वरूपात येथे देत आहोत. त्यांचे अनुभव इतके विविध आहेत की इतक्या कमी जागेत त्यांच्या सर्व अनुभवांविषयी देणे कठीण आहे, याची आम्हाला जाणीव आहे. - संपादक*

१९ जुलै १९२६ ही माझी जन्मतारीख. नाशिकला जन्म झाला व वयाच्या १९व्या वर्षी १९४५ साली मुंबई विद्यापीठाची मॅट्रिकची परीक्षा मी उत्तीर्ण झालो.

**उत्तरार्ध** : मार्च ते जून १९४५ लाहोर येथे मित्राबरोबर वास्तव्य. १९३९ ते १९४५ दरम्यान झालेल्या दुसऱ्या जागतिक युद्धाचा मे १९४५ मध्ये झालेला विजय समारंभाचा लाभ लाहोरमध्ये घेतला. त्यावेळी लाहोर हा भारताचा भाग होता. १९४७च्या फाळणीनंतर तो भाग पाकिस्तान मध्ये गेला.

**व्यवसाय** : जून १९४५ ते १९४८ या काळात ठाणे डिस्ट्रीक्ट कोर्टात टंकलेखक म्हणून नोकरी. टंकलेखनाचा वेग ६० च्या वर होता. १६ऑगस्ट १९४८ ते मार्च १९५७ सरकारी नोकरी. मुंबईला स्वतंत्र ग्रेटर बॉम्बे स्थापन झाले. तिकडे नोकरी बदलून घेतली. मा. जे. एम. शेलाट, मा. जयवदन भट्ट, मा. कार्ल खंडाळावाला, मा. व्ही. डी. तुळजापुरकर या नामवंत न्यायाधीशांचा टंकलेखक म्हणून काम केले. मा. जे. एम्. शेलाट व मा. व्ही. डी. तुळजापुरकर हे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश होते.

कोर्टाची नोकरी मार्च, १९५७ पर्यंत झाली. या दरम्यान, सरकार मार्फत दुय्यम फोज योजने अंतर्गत १९५२ पर्यंत सैनिक शिक्षण घेतले. रिव्हॉलवर ते लाईट मशीन गन (LMG) हाताळण्याचे शिक्षण प्राप्त झाले. पहिले पाकिस्तान युद्ध झाले तेव्हा प्रत्यक्ष लष्करी कारवाई करणाऱ्या सैनिक दलाला पोषक अशी जबाबदारी पार पाडली. त्यात समुद्री तोफांचे, लष्करी अधिकाऱ्यांची निवास स्थाने, दारु गोळा साठे या सर्वांचे रक्षण कार्य करावे लागले. खडकी (पुणे) येथून दारुगोळा सामग्री आग्रा येथे पोहचविणे ही सर्वांत मोठी जबाबदारी होती. १९५२ नंतर मुंबईमधील 'दुय्यम फोज' व्यवस्था कोल्हापुरला हलवली तेव्हा यातून सुटका झाली. पाकिस्तानच्या दुसऱ्या लढाईच्या वेळी WARDEN POST सेवा केली.



श्री. मा. ना. पाटील

**१९५७ जून ते १९९०** : खाजगी नोकरी. अे.सी.सी. कंपनीत, पैकी १९५७ ते १९६४ चर्चगेट येथील मुख्य कार्यालय व १९६४ ते १९९० ठाणे येथे सेंट्रल रिसर्च स्टेशन.

१९५८ ते १९६२ प्रथम नौपाडा ग्रामपंचायत व नंतर नौपाडा ठाणे नगरपालिकेत समाविष्ट झाल्यावर नगरसेवक म्हणून कार्य केले. १९५७ मध्ये ACC मध्ये दाखल झाल्यानंतर गुणाकर जोशी यांची ओळख झाली. त्याच सुमारास संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जोर धरत होती.

नागरिक संपर्कामध्ये डॉ. वा. ना. बेडेकरांची व इतर मान्यवरांची जवळिक सुरु झाली. डॉक्टर या नात्याने डॉ. बेडेकरांची फक्त ओळख होती. १९५७ ते ५८ या वर्षात विद्या प्रसारक मंडळाशी सभासद या नात्याने प्रत्यक्ष संबंध आला. २९ सप्टेंबर १९५७ (विजयादशमी) रोजी झालेल्या विद्या प्रसारक मंडळाची गाजलेली सभा - ज्यामध्ये डॉ. वा. ना. बेडेकर प्रथम अध्यक्ष झाले.

१९५७ - ५८ पासून मंडळाच्या कार्यात सहभाग होता. १९५८ ते १९८८ जवळ जवळ ३० वर्षे मंडळाचा कार्यवाह म्हणून काम केले. १९८८ ते १९९० जुलै कार्याध्यक्ष व नंतर सभासद म्हणून आजही मंडळाच्या कार्यात सहभागी आहे.

१९६२ मध्ये ठाणे नगर पालिकेची निवडणूकी साठी डॉ. बेडेकरांनी व काही प्रमुख नागरिकांनी ‘शहर सुधारणा मंडळ’ काढले होते. त्या मंडळातर्फे निवडणूक लढवली. त्यानंतर पक्षीय राजकारण (काँग्रेस, शिवसेना वगैरे) जोर धरु लागले व शहर सुधारणा मंडळ नामशेष झाले व श्री. गुणाकर जोशी, मी व इतर सहकारी यांनी जनसेवा सोडून शैक्षणिक क्षेत्रामार्फत जन सेवा जोमाने चालू ठेवली. तीच सेवा म्हणजे विद्या प्रसारक मंडळाचे कार्य १९५८ ते २००५ (सुमारे ४७ वर्षे) डॉ. वा.ना. बेडेकरांचे दोन्ही हात (श्री. गुणाकर जोशी उजवे व मी स्वतः डावा हात) या नात्याने अखंड करीत राहिलो. पैकी उजवा हात (श्री. जोशी) माझ्या आधी १९७९ निखळून गेला. तरीही जनसेवा ही अखंड चालू आहे.

मंडळाच्या प्रत्येक शालेय/महाविद्यालयीन कार्यक्रमात सहभाग होताच, पण मंडळातर्फे शैक्षणिक निधीसाठी होणाऱ्या कार्यक्रमांकरिता बऱ्याच वेळा धावपळ करणे, जाहिराती मिळविणे, तिकीटे खपविणे इत्यादी पासून ते कार्यक्रम पार पडेपर्यंत काम केले, आणि मुख्य म्हणजे या सर्व जुन्या गोष्टी अजूनही स्मरणात आहेत.

आता जास्त फिरणे होत नाही. त्यामुळे मंडळाच्या कार्यालयात येवून २/३ तास बसतो. डॉ. वा. ना. बेडेकरांच्या (ते हयात असताना) सांगण्यावरून व विनंतीवरुन मंडळाचा २००२ पर्यंतचा ६५ वर्षांचा इतिहासाच्या (जो मंडळाचे पूर्वीचे कार्यवाह कै. अ.धों. टिल्लू यांनी मराठीतून लिहिला होता.) पुस्तकाची इंग्रजी आवृत्ती काढण्यासाठी, त्यात योग्य त्या तांत्रिक सुधारणा व काही अधिक माहिती जी मराठी पुस्तकात आलेली नाही ती सर्व गोळा करुन इंग्रजी रुपांतरित पुस्तक लिहून पूर्ण केला. त्यात श्री. करंदीकर, मंडळाचे आताचे अध्यक्ष यांची मोलाची मदत झाली.

आणि आता मंडळाचे व मंडळाच्या सर्व विभागांचे विविध कार्यक्रमांचे प्रसंगानुरुप जुने नवीन फोटो, तसबीरी केलेले फोटोंचे, इमारतींचे ब्लॉक्स यांचा एकत्रित चित्रमय अल्बम तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. जो पर्यंत शरीर साथ देईल तो पर्यंत मी मंडळाचे काम करीत राहीन.

आनंद एकच की केलेल्या मेहनतीचे कष्टाचे फळ मला ह्याच देही याच डोळा बघावयास मिळत आहे. जीवन हे कृतार्थ झाल्याचा आनंद आहे.

**- श्री. मा. ना. पाटील**

दि
शा
{Z`{_V
dmMm.

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*

सत्कार मूर्ती

# श्री. विठ्ठल गणेश काळे

**लहानपण व शिक्षण :** माझे १०व्या वर्षापर्यंतचे बालपण कल्याण व मुंबई येथे व्यतीत झाले. वयाच्या दहाव्या वर्षी मी आई वडिलांसोबत ठाण्याला आलो. नंतर ७० वर्षे एवढा दीर्घकाळ ठाणे निवासी होतो.

ठाणे येथे न्यू इंग्लिश स्कूल मधून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झालो. तद्नंतर महाविद्यालयीन नियमित शिक्षण मला मिळाले नाही. मी मुंबईच्या सिडेनहॅम कॉलेजमध्ये इव्हिनींग क्लासेस मध्ये प्रवेश मिळविला व दोन वर्ष मुदतीचे "Diploma in Secretarial Practice" कोर्स उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण झालो. ह्या कोर्सेसचा अभ्यासक्रम उच्च दर्जाचा होता.



श्री. विठ्ठल गणेश काळे

वयाच्या विसाव्या वर्षी मला मेसर्स पी.जी. भागवत, चार्टर्ड अकौंटस्, मुंबई यांच्या ऑफिसात ऑडिट क्लार्क म्हणून नोकरी मिळाली. त्यांच्याच ऑफिसात चार्टर्ड अकौंटंट कोर्सकरिता उमेदवारी केली व सन १९५० मध्ये पहिल्याच प्रयत्नात सी.ए. ची परीक्षा उत्तीर्ण झालो. परीक्षा उत्तीर्ण होणारा ठाण्यातील पहिलाच. त्यावेळी सी.ए. या कोर्सविषयी जनतेमध्ये अज्ञान होते. बहुसंख्य लोक विचारीत असत तुम्ही सी.ए. ही परीक्षा पास झालात, पण सी.ए. म्हणजे काय ?

**सी.ए. चा व्यवसाय :**

भारताला नुकतेच स्वातंत्र्य मिळाले होते. ठाण्यातील उद्योगधंदे बाल्यावस्थेत होते. ठाण्यात एकच नाव घेण्याजोगी मोठी इंडस्ट्री होती. ती म्हणजे 'रेमंड वुलन मिल्स', अशा अवस्थेतही मी निर्णय घेतला की सी.ए. म्हणून स्वतंत्रपणे व्यवसाय करायचाच. सुरुवातीला हाताच्या बोटावर मोजता येतील एवढीच कामे मिळाली. त्यात 'विद्या प्रसारक मंडळ' या संस्थेची गणना होती. त्यावेळी विद्या प्रसारक मंडळाची मॅनेजमेंट आताच्या पेक्षा वेगळी होती. एकच प्राथमिक शाळा हे मंडळ चालवीत होते. व्यवसायात जम बसविण्यासाठी बरीच वर्षे तपश्चर्या करावी लागली. जशजशी वर्षे पुढे जात होती तसतशी कामेही वाढत होती.

**विद्या प्रसारक मंडळ व भारत सहकारी बँक :**

माझ्या माहितीप्रमाणे डॉ. वा. ना. बेडेकर, श्री. गुणाकर जोशी , श्री. टी. एम्. फडके इत्यादी मंडळींनी वर वर्णन केलेल्या विद्या प्रसारक मंडळाची मॅनेजमेंट आपलेकडे घेतली. डॉ. बेडेकर व श्री. गुणाकर जोशी यांचे विद्या प्रसारक मंडळाच्या वाढीत मोठे योगदान आहे. सुरुवातीला काही वर्षे श्री. वि. रा. परांजपे हे मंडळाचे कार्यवाह होते. त्यानंतर श्री. मा. ना. पाटील हे कार्यवाह म्हणून संस्थेला लाभले. श्री. रामभाऊ गोखले, श्री. खर्डे, श्री. करंदीकर इ. बरेचजण मंडळाच्या कार्याला निष्ठेने हातभार लावीत होते.

डॉ. वा. ना. बेडेकरांना सामाजिक कामे करण्याचा भारी 'षोक' होत. पुष्कळदा कामात अडथळे येऊन काम ठप्प होई त्यावेळी ते उद्विग्न होत. (काही वेळा मला उद्वेगाने म्हणत, काळे कामात अडथळे आले की हे सर्व सोडून द्यावे असे वाटते. पण सामाजिक काम करण्याची आम्हाला 'खाज' ना! ते केल्याशिवाय चैन पडत नाही.)

आपण ठाण्यात एक बँक काढावी असे डॉक्टरांच्या मनाने घेतले. मग काय, भाग-भांडवल

जमविण्यासाठी त्यांनी जवळजवळ पदयात्राच काढली. ते आणि शंकरराव मराठे हे घरोघरी हिंड  त. माझ्या घरीही येऊन गेले. आणि एकदाची 'भारत सहकारी बँके' ची स्थापना झाली. डॉ. बेडेकरांमुळेच भारत सहकारी बँकेचा 'आद्य' लेखापरीक्षक बनण्याचा मान मला मिळाला. सदर बँकेचे काम करताना संचालक, श्री. अुत्तम जोशी व श्री. मा. य. गोखले (बिल्डर) या दोघांचा परिचय झाला. हे दोघेही सध्या विद्या प्रसारक मंडळाचे पदाधिकारी आहेत.

**सामाजिक कार्य :**

फॅमिली डॉक्टर म्हणून डॉ. बेडेकर यांच्याशी माझा परिचय होताच. परंतु विद्या प्रसारक मंडळाच्या कामामुळे एक समाज कार्यकर्ते म्हणून निराळया दृष्टीकोनातून त्यांची ओळख झाली. त्यांचेबरोबर श्री. गुणाकर जोशी यांचीही ओळख झाली. श्री. गुणाकर जोशी यांच्या प्रोत्साहनाने मी नौपाडा ग्रामपंचायत निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समितीच्यावतीने भाग घेतला व विजयी झालो. परंतु, लवकरच ठाणे नगरपालिकेत नौपाडा ग्रामपंचायत विलीन झाली. पुढे १९६२ साली ठाणे नगरपालिकेची निवडणूक लागली. त्यावेळच्या भारतीय जनसंघातर्फे पालिकेची निवडणूक लढवली व विजयी झालो. चार वर्षे नगरसेवक म्हणून काम केले. त्याकाळी नगरसेवकाला 'नगरपिता' म्हणत. सोशल लीग, मेडिकल रिलीफ ट्रस्ट, ठाणे जिल्हा बुद्धीबळ असोसिएशन ह्या सामाजिक संस्थाचा मी काही काळ पदाधिकारी होतो. सामाजिक कार्याचा माझ्या स्वतःच्या व्यवसायावर खूप ताण पडू लागला. म्हणून एका सामाजिक कामातून सुटका करुन घेत १९७० नंतर मी सामाजिक कार्यकर्ता राहिलो नाही.

**तत्त्वचिंतन व धार्मिकता :**

ठाणे शहरातील कौपिनेश्वर मंदिरात श्री. भावे (मिठागरवाले) यांच्या प्रोत्साहनाने 'ज्ञानकेंद्र' ही संस्था स्थापन झाली. श्री. शंकरराव मठ हे केंद्र चालवितात. धर्म व  तत्त्वज्ञान विषयक वाङ्मयाने भरलेली खूप पुस्तके व ग्रंथ या केंद्रात आहेत. सदर केंद्रात भाग  घेऊन विविध ग्रंथांचा अभ्यास केला व केंद्रामध्ये जमत असलेल्या मंडळींपुढे त्यांचे परिशीलन केले. आध्यात्मिक उंची वाढण्याकडे ह्याचा फार उपयोग झाला. जे. कृष्णमूर्ती यांची पुस्तके वाचून त्यांच्या तत्त्वज्ञानाकडे मी बराच आकृष्ट झालो व त्यांचा चहाता बनलो.

काही पिढ्यांपूर्वी सोडलेले आमचे मूळ गाव 'गोळप'.  माझे सासर रत्नागिरीचे. कुतुहल म्हणून मूळ गावी गेलो असता कळले की शेजारच्या 'पावस' गावात 'स्वामी स्वरूपानंद' म्हणून ओळखले जाणारे एक सत्पुरुष वास्तव्य करतात. त्यांचेकडे जाण्याचा तेथील बऱ्याच जणांनी आग्रह धरला. पण बुवा, महाराज इ. बद्दल मी अश्रद्ध होतो. सुरुवातीला मी त्यांचेकडे जाण्यास नकार दिला. पण आग्रह खूप वाढल्याने तेथे गेलो. माहिती करुन घेतली तेव्हा दिसून आले की आपल्याला  वाटतो तसा प्रकार इथे नाही. अधिक परिचय झाल्यावर मी स्वामींचा निष्ठावंत शिष्य झालो. त्यांच्या स्वामी स्वरुपानंद सेवा मंडळाचा लेखा परीक्षक म्हणून गेली ३५ वर्षे मी काम पहात आहे, अर्थात सेवा   म्हणून.

**सद्य स्थिती :**

सुमारे तीन वर्षापूर्वी मी व माझ्या पत्नीने ठाणे सोडून रत्नागिरीस स्थलांतर केले. केवळ हौस म्हणून. रहाण्यास विमानतळाजवळ सुंदर बंगलावजा घर खरेदी केले आहे. दोन मुले व तीन मुली सुखासमाधाना आहेत.

दोन वर्षांपूर्वी जीभेच्या जीवघेण्याकर्करोगाने गाठले. परंतु सुरुवातीच्या पायरीवर व्यथा असल्याने डॉक्टरी उपायाने पूर्ण बरा झालो. असा मी छोटेखानी जीव आनंदात आहे.

**- वि.ग. काळे**

# मूर्ती आणि मूर्तिपूजा

*सर्व चराचरात ईश्वर पहाणारी भारतीय संस्कृती. या संस्कृतीने मनातील ईश्वराला साकार रूप देतान मूर्त रूप देतांना ज्या मूर्ती या संस्कृतीत मान्य पावत गेल्या त्या विषयीची ही लेख माला. यातील तिसरा लेख देत आहोत.*

*- संपादक*

**(भाग तिसरा)**

शिल्पात असलेले अनेक हात त्या मूर्तीतील विविध गुणांचे दर्शन घडवितात. मूर्तीच्या स्वभावाचे दर्शन तिने धारण केलेल्या आयुधामुळे घडते अगर कोणत्या अवस्थेत ती मूर्ती आहे त्यावरूनही ध्यानात येते.जेवढे मूर्तीला हात जास्त तेवढे तिच्या ठिकाणी गुण जास्त. बहु हस्त देवता ही तामसिक मानली जाते. त्याचप्रमाणे कमीत कमी हात कमीत कमी गुणांचे निदर्शक आणि हस्तरहित मूर्ती म्हणजे निर्गुण ब्रह्म स्वरुप. अशारीतीने तामसिक अवस्थेपासून निर्गुणापर्यंत शिल्पांची वाटचाल झालेली दिसून येते. थोडक्यात विग्रहाबाबत उत्क्रांत अवस्था अनुभवता येते. म्हणून साधकाला साधनेपूर्वी त्याच्या साधनेसाठी योग्य अशी मूर्ती निवडावी लागते. त्यावरच त्याची इच्छापूर्ती अवलंबून असते. साधकाला प्रतिमा या भूमितीच्या आकृती सारख्या आहेत. एखादा शिक्षक भूमिती शिकवताना वर्तुळ हाताने काढील अगर कंपासच्या सहाय्याने रेखीव काढील. त्याच्या पाठीमागचा आशय दोनही बाबतीत शिष्याला सारखेच. कारण वर्तुळ समजण्यापुरताच त्या रेखाटणाचा उपयोग असतो. त्याच प्रमाणे ओबड - धोबड प्रतिमा आहे का रेखीव आहे या बद्दल साधक विशेष काळजी घेत नाही. परंतु ते शास्त्रसंमत आहे व पूजनीय आहे हाच विचार त्याच्या ठिकाणी निश्चित होतो. सुंदर मूर्ती ही महत्त्वाची बाब नसून ती शास्त्रानुरुप आहे की नाही ही त्याची खरी चिंता असते. मूर्ती सुंदर असूनही ती शास्त्रानुरुप नसेल तर ती तो स्वीकारणार नाही. कारण चिन्ह हे त्याच्या उपासनेचे लक्ष असते. रेखीव वा सौंदयपूर्ण मूर्ती ही त्याच्या उपासनेचा विषय नसते. सुंदर स्त्रीपेक्षा माता-बालकाचे लक्ष्य असते. याचा अर्थ असा नव्हे की मूर्ती सुंदर असू नयेत. मूर्तीकाराला सौंदर्यही अपेक्षित असते. आगम व तन्त्र शास्त्रात याही बाबतीत असे म्हटले आहे की मूर्ती जास्तीत जास्त सुबक असावी, शास्त्रानुरुप असावी, मात्र मूर्ती ही उपासनेसाठी असते याचे भान ठेविले पाहिजे.

**प्राचीन शिल्प :**

शिल्पकला व रंगकाम हे प्राचीन काळी पूर्णतेला पोचलेले शास्त्र होते. याचा प्रत्येक भारतीयाने अभिमान बाळगावा. प्राचीन शिल्प व रंगीत चित्रे, विद्यमान कोणत्याही प्रगत राष्ट्राच्या शिल्प इत्यादीशी केवळ बरोबरीच करतात असे नसून काही प्रमाणात वरचढ आहेत. आपल्याकडील शिल्पकला प्रगत होती. शिल्पकारांत नैपुण्य व उत्साह भरपूर होता. हा शिल्पी निसर्गाशी एकरुप होऊन जात असे. त्याची कल्पकता व त्याचे निसर्ग अवलोकन यातून तो शिल्प घडवीत असे. त्यामुळे शिल्पात जिवंतपणा आढळतो. त्याला यांत्रिक पद्धतीचे काम कधीच आवडले नाही. तो मनसोक्त व मनमोकळेपणाने शिल्प घडवीत असे. त्या मुळे त्याच्या शिल्पाकृतीत सहज सुंदरता पाहावयास मिळते.

**कला अवनत का झाली :**

याला प्रथम तडा गेला ज्या वेळी त्याच्या कल्पकतेवर व नैसर्गिक स्वातंत्र्यावर घाला घातला गेला. तंत्रवाङ्मयामुळे त्याचे स्वातंत्र्य संपुष्टात आले. तन्त्राने आपले विचार त्यावर लादले. त्याला नियमबद्ध केले.

आणि त्याच्या कल्पकतेचा बळी घेतला. तन्त्राने उपासनेला आवश्यक असे नियम बनवले. इतकेच नव्हे या नियमाप्रमाणे मूर्ती घडविली गेले पाहिजे आणि नियमांचा अनादर केला जाऊ नये हा दंडक घातला. मूर्तीचे प्रत्येक अवयव प्रमाणबद्ध कसे असावे, त्याची ठेवण कशी असावी, मूर्तीची लांबी, रुंदी, उंची, चेहरा इत्यादि गोष्टी आगम व तन्त्रशास्त्रानुरुप कलाकाराला करावयास लागल्याने त्याचे स्वातंत्र्य गेले. त्याच्या अभिजात कल्पनाशक्तीला मर्यादा बसली. कलात्मकता वाढली, सहजता गेली. प्रमाणबद्धता आली. कल्पकता नष्ट झाली. शिल्पकला अभिजात स्वरूपात न टिकण्याचे हे एक कारण होय. याला दुसरेही कारण आहे आणि ते विशेष महत्त्वाचे आहे. कालांतराने हिंदु राजांची गळती झाली. त्या प्रमाणात मंदिरांची बांधणी कमी होऊ लागली. त्यामुळे देवतांच्या मूर्ती, कलाकुसर, शिल्प आदी कमी झाले. कलेला उत्तेजन मिळेनासे झाले. तसे कलाकारही कमी झाले. शास्त्रानुरुप देवतेची मूर्ती असावी असा आजही कटाक्ष आहे. सौंदर्यही असावे हे ही पाहिले जाते. परंतु त्याकडे कटाक्षाने पाहिले जातेच असे नाही. रेखीवपणा, ठाशीवपणा इत्यादी प्रकार उपासनेच्या दृष्टीने महत्त्वाची अंगे नसल्याने सौंदर्य आदी बाबतचा दृष्टिकोण कमी आढळतो.

**मूर्ती स्वरुपात कालानुरुप बदल :**

भारताच्या निरनिराळ्या भागात व निरनिराळ्या कालखंडात मूर्ती अस्तित्वात आल्या असल्या तरी त्यातील महत्त्व थोड्याफार फरकाने सुसंबद्धच असल्याचे आढळते त्याची ओळख करुन घेणे आवश्यक आहे. प्राचीन शिल्प नियमावलीच्या बंधनापासून मुक्त असलेले आढळते. पुढील काळातील शिल्प नियमानुसार रेखीव, कृत्रिम असलेले आढळते. प्राचीन शिल्पातील वैशिष्ट्ये पाहाताना या गोष्टी विशेष नजरेत भरतात. प्राचीन शिल्पात नाकथिटे, ओढ जाड, आढळतात. पुढील काळातील शिल्पात नाक सरळ रेषेत, एखादी सरळ त्रिकोणी आकृती चिकटविल्यासारखी टोकदार व धारदार झालेले पाहावयास मिळते. ओठ देखील पातळ झाले. पोट त्रिवलयांकित सैल न राहता प्रमाण बद्ध झाले. प्राचीन काळी तोंड हे गोल किंवा वर्तुळाकार असे, पुढील काळात ते लंब वर्तुळाकार झाले. डोळे पूर्वी रेखीव व लांब नसत, पुढील काळात रेखीव व मीनाकृती धारण करणारे डोळे झाले. अशाप्रकारे सर्वच बाजूने मूर्ती प्रमाणबद्ध झाली. म्हणूनच पूर्वीचे शिल्प हे नैसर्गिक आढळते त्यातील सौंदर्य कृत्रिम गोष्टीवर आधारित नव्हते.

**शिल्प पद्धती :**

वरील गोष्टींचा विचार करता शिल्पाचे नमुने व त्याची बद्धता यावरुन वेगवेगळे शिल्प प्रकार कल्पिण्यात आले. शिल्प पद्धतीचे चार प्रकार - १) मथुरापद्धती २) चालुक्य पद्धती -बदामी येथील तसेच पल्लव राजे यांची कांची येथील शिल्पाकृति. वरील दोनही पद्धतीतील वैशिष्ट्ये साधारणतः सारखीच आढळतात. वैशिष्ट्ये - अत्यंत साधेपणा तरीही तेजस्वी. अत्यंत नैसर्गिक स्वरुपात पाहावयास मिळतात. दक्षिणतील चाल्ड व पांड्ये यांची कृतीदेखील पल्लवासारखीच आढळते. ३) चालुक्य - होयसाळ या पद्धतीत आभरणे अस्तित्वात आली. मूर्ती आभरणांनी युक्त आढळतात. मूर्ती सुंदर, सुबक, प्रत्येक अवयव रेखीव असतो. या पद्धतीत परंपरा ही फार महत्त्वाची मानली जाते. म्हणून ठिकठिकाणी या पद्धतीच्या मूर्तीत विलक्षण साम्य आढळते. त्याच प्रकारे अलंकार, कपडे, मुकूट, बैठक आणि इतर प्रभावळ इत्यादी. जी कोणती देवता असेल त्याच पद्धतीचे हे प्रकार सर्वत्र आढळतात. अगदी साचेबंद काम दिसते.

**काही देवळांचे कालांतराने महत्व नाहीसे झाले.**

काही काळ अत्यंत प्रिय झालेल्या देवता कालांतराने त्या कमी महत्त्वाच्या झाल्या आणि त्यांच्या

जागी नवीन देवतांचा उदय होताना आढळतो. इ.स. ५ ते ९ व्या शतकापर्यंत काही देवता प्रतिष्ठा पावलेल्या आढळतात. उदा. दुर्गा, ज्येष्ठा. त्यातल्या त्यात ज्येष्ठा देवी त्याकाळी फारच मानली जात असे. बोधायन गृह्यसूत्रात तिच्या पूजनाबद्दल एक संपूर्ण प्रकरण खर्ची पडलेले आहे. ह्या देवीचे त्रिकुट असे. मधे स्त्री देवता, उजव्याबाजूला बैलाचे तोंड असलेली पुरुष देवता व डाव्याबाजूला एक सुंदर स्त्री. अशा प्रतिष्ठित मूर्तीची विल्हेवाट लागली. मोठ्या देवळात एखाद्या कोपऱ्यात या देवतेला स्थान प्राप्त झालेले आहे. तिची नित्य पूजा-अर्चाही केली जात नाही. गोवर, कांजिण्या अशा साथीच्या वेळी शीतला देवी या नावाने तिचे लोक पूजन करतात. तसेच विष्णूचे अवतार. वराह व नृरसिंह या मूर्तीचे झाले आहे. या मूर्ती कुठेतरी कोपऱ्यात आढळतात. तन्त्र व आगम शास्त्रानुरुप प्रत्येक शिव मंदिरात गर्भ गृहाच्या पश्चिम बाजूला या मूर्ती असावयास हव्या. या मूर्तीची स्वतंत्र मंदिरे चालुक्य व पल्लव काळात असलेली आढळतात. नवीन मंदिरे मात्र कुठे आढळत नाहीत. नृरसिंह उग्र मूर्ती आहे. त्याचे यथासांग पूजन न झाल्यास त्रास व पीडा होईल. या भीतीने मंदिरे बांधली जात नाहीत. दक्षिणेत कार्तिकेय याची देवळे खूप आहेत. तिकडे सुब्रमण्यम् या नावाने ही देवळे ओळखली जातात. उत्तर भारतात या देवतेची पूजा केली जात नाही. महाराष्ट्रात सवाष्ण बाई कार्तिकेय मंदिरात प्रवेश देखील करत नाही. योगमूर्ती विष्णु फक्त बदरीनाथला आहे. त्याची प्रतिकृती श्रीरंग येथे आहे.

**काही कारणे :**

वेळोवेळी नवीन देवता आणि त्यांच्या प्रतिमा अस्तित्वात येत असतात. याला दोन - तीन कारणे आहेत. मोठाले साधु संत व आचार्य होऊन गेल्यामुळे काही देवता प्रकाशात आल्या. या देवतेत शैव व वैष्णव या दोन्हींचा समावेश आहे. कारण साधु या दोनही पंथात होऊन गेले. काही वैष्णव भक्तांच्या प्रतिमा विष्णु मंदिरात आढळतात. काही आचार्यांच्या नावे प्रतिमा अस्तित्वात आल्या आहेत. उदा. शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य इत्यादी काही प्रसिद्ध स्थळी त्या स्थळ महात्मामुळे मंदिरे उभी राहिली. उदा. 'कांचीपुरम्' याला तमिळ भाषेत कच्छि असे नांव आहे. तेथील शिवालयाला 'कच्छेपेश्वर' म्हणजे 'कासव' म्हणतात. या शिवाची पूजा विष्णु करत असे. हे कूर्मावताराचे मंदिर आहे.

बृहत् संहितेत वराह मिहीर म्हणातात, 'देशानुरुप, आभूषण, वेषालंकार **मूर्ति भिः कार्या प्रतिमा लक्षण युक्ता सन्निहिता वृध्दि भवति ।''** ज्या देशातील मूर्ती असतील तेथील वेश अलंकार यानी ती युक्त असावीत. शास्त्रानुरुप मूर्तीच्या रचना असाव्यात. त्या लाभदायक ठरतात. म्हणूनच तेथील रीती रिवाजानुसार वेष आभरण तोंडावळा इत्यादी मूर्तीच्या ठिकाणी असणे अगत्याचे आहे. त्यात कसलाही बदल हा शास्त्र विरुद्ध होईल. या गोष्टीला फारसे उत्तेजन मिळालेले दिसत नाही. तन्त्र आणि आगम शास्त्रातील नियमच पाळले जातात. नियम सर्व मान्यता पावल्यामुळे मूर्ती साधारण कोणत्याही प्रातांतली असली तरी ती सारख्याच पद्धतीची आढळते. थोडाफार फरक असला तरी खूप वैविध्य आढळत नाही. सूर्य देवतेच्या दोनही हातात कमल पुष्प असावेत. दोन्ही हात खांद्यापर्यंत वर उचलेले असावेत. काही वेळा हात कमरेपर्यंतच उंच उचलेले आढळतात हा सूक्ष्म फरक कोणाला जाणवत नाही. सर्व साधारण तन्त्र नियम पाळले जातात एवढाच अर्थ.

**मूर्तीची घडण :**

मूर्ती घडविण्यासाठी कोणते द्रव्य घ्यावे या बद्दलही आगमात वर्णन आले आहे. मूर्ती दगड, धातू, रत्न, माणिक, वैदूर्य यांनी अगर दोन - तीन धातूंच्या मिश्रणाने घडवावी असे म्हटले आहे. मौल्यवान दगड कोणता? स्फटिक, पक्षराज, वज्र, वैदूर्य, निद्रुप (पोवळे)

रत्न इत्यादी. स्फटिक दोन प्रकारचे असतात. सूर्यकांत व चंद्रकांत. काही लोक याच यादीत भर घालून चुनखडी, हस्तिदंत यांचा समावेश करतात. साधारणपणे अचल मूर्ती गर्भगृहात स्थिर केल्या जातात. ही बहुधा दगडाची असते. अगदी थोडक्याच मूर्ती लाकडी असतात. पुरी येथील जगन्नाथाची मूर्ती, दक्षिण अर्काट येथील त्रिविक्रमाची मूर्ती या लाकडी आहेत. श्रीरंग येथील मूर्ती चुनखडीची असावी असे म्हटले जाते. तसेच त्रिवेंद्रम येथील अनंतशयनम् ही मूर्ती त्याच पद्धतीची आहे. अचलमूर्ती क्वचितच धातूच्या आढळतात. फक्त उत्सव, स्वपन आणि बळी याच मूर्ती धातूच्या असतात. काही वेळेला मौल्यवान वस्तूने मूर्ती घडविल्या जातात. ब्रह्मदेशाचा राजा थिबा याच्या राजवाड्यात रत्नांनी घडविलेली बुद्धाची मूर्ती आहे. असा उल्लेख आढळतो. चिदंबर येथील शिवलिंग स्फटिकाचे आहे आणि ९ इंच उंचीचे आहे. पीठिका पण स्फटिकाची असून तितकीच उंच आहे.

साधारणपणे दहावे शतक उजाडेपर्यंत ब्राँझ धातूची मूर्ती घडविली जात नसे. कदाचित ओतीव काम हे भारतीयांनी उसने घेतले असावे असे काहींचे म्हणणे आहे. परंतु मेणाच्या सहाय्याने ओतीव काम येथे चालू होते. याची अनेक उदाहरणे आढळतात. कारणागम, सुप्रभेदागम आणि विष्णुसंहिता या ग्रंथातून याबद्दल दाखले आढळतात. धातूंची मूर्ती घडविण्यास ती मेणातून ओतीव पद्धतीने करावी आणि मग वर मातीचा लेप द्यावा, अशा पद्धतीने सोने वितळवून त्याच्या ओतीव मूर्ती बनवत असत. बृद्धीश्वर तंजावर येथील देवळात या ओतीव-पोकळ व भरीव मूर्ती संबंधी उल्लेख आहेत.

अचल मूर्ती दगडाचीच बनवली जाते. त्या दगडाचा रंग कळू नये यासाठी तेल फासले जात असे. आगमशास्त्र नियमाप्रमाणे उत्सव, कौतुकमूर्ती यांना पाण्याने स्नान घालावयाचे नसते. त्यामुळे या मूर्ती काही वेळा रंगीत आढळतात. स्नपन मूर्ती ही वेगळीच असते. महाबलिपुरम् येथील वराहस्वामीची मूर्ती रंगीत आढळते. वेरूळ येथील मूर्तींत अद्याप काही छटे आढळतात. छाया प्रकाश याचे ज्ञान होण्यासाठी या रंगांचा उपयोग होतो. वारा, पाणी इत्यादी प्रकार चित्रीत करताना काही चिन्हांचा वापर करीत असत. वाऱ्याची दिशा व्यक्त करण्यासाठी मेघांच्या रांगा दाखवून आणि तरल रेखांनी पाण्याबद्दल सूचक चिन्हांचा वापर करुन नजरेस आणून दिली जाते. पर्वत इत्यादी साठी मोठाले ठिपके तसेच दैवी योनी ध्यानात आणण्यासाठी पंख लावले जात. ही योनी आकाशात संचार करणारी आहे, असे व्यक्तकेले जात असे.

या संबंधीचे अधिकृत ग्रंथ संस्कृत भाषेतील आगम, तन्त्र, पुराणे इत्यादी होत. अलीकडे या ग्रंथांचे वाचन अत्यल्प होत असल्याने कितीतरी गोष्टी आपणास माहीत होत नाहीत. वैखानस आगमात वैष्णव देवता बद्दल विशेष माहिती आहे. तसेच दक्षिणेतील तमिळ भाषेत अलवार, विष्णुभक्त यांनी नवव्या शतकात या बद्दल माहिती लिहून ठेविलेली आहे. तंत्र आणि अगम साधारणपणे ९व्या ते १२व्या शतकात विशेषत्वाने लिहिले गेले आहेत. वराह मिहिर याची बृहत्संहिता हा ग्रंथ देखील शिल्पशास्त्रावरील जुना ग्रंथ आहे. आपल्या पूर्वजांनी अनेक बाबतीत सखोल अभ्यास केलेला आहे. त्याचा मागोवा घेतल्यास कितीतरी गोष्टींचा उलगडा होईल. आपणा सर्वांचे लक्ष पूर्वजांनी केलेल्या कार्याकडे वळावे हाच हेतू आहे. तरच आपणा सर्वांना आपल्या सांस्कृतिक जीवनाचे दर्शन योग्य रीतीने घडू शकेल.

(क्रमशः)

**- शं.बा.मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

aaa

# वरेरकरांच्या नाटकातील 'स्त्री दर्शन'

*आमच्या कला वाणिज्य महाविद्यालयातर्फे कविवर्य पी. सावळाराम निबंध स्पर्धा ७७,७८ व ७९ या वर्षी घेण्यात आली होती. त्या स्पर्धेत पारितोषिक पात्र ठरलेला हा लेख आमच्या संग्रहात होता. अभ्यासपूर्ण असा हा लेख दिशाच्या वाचकांसाठी देत आहोत. - संपादक*

वरेरकरांचे नाव घेतल्याशिवाय जसा 'मराठी रंगभूमीचा इतिहास' लिहिता येत नाही, तसाच 'भारतीय स्त्रीचा वाङ्मयीन इतिहासही' लिहिता येत नाही. 'कुंजविहारी' (१९०८) या त्यांच्या पहिल्या नाटकापासून ते ' रविंद्रनाथ ठाकूरांच्या सात नाटकांच्या अनुवादापर्यंत (१९६२)' त्यांच्या अनेक नाटकांनी, अनेक प्रकारचे विक्रम केले. त्यातला महत्त्वाचा विक्रम म्हणजे त्यांनी 'मराठी रंगभूमीवर आणलेल्या स्त्री स्वातंत्र्याची जाणीव झालेल्या, जागृत, बंडखोर स्त्रियांची संख्या' हा होय. वरेरकरांनी रंगभूमीवर आणलेल्या विविध प्रकारच्या स्त्रियांचा आढावा घेण्याआधी, त्यांनी लिहिलेल्या (एकूण नाटकांची कालानुक्रमे अुपलब्ध यादी आपण पाहू या.)

**वरेरकरांची नाटके : (कंसात नाटकाचा कालावधी दिला आहे.)**

(१) कुंजविहार (१९०८) (२) संजिवनी (१९१०) (३) सरस्वति (१९१३) (४) वरवर्णिनी (१९१३) (५) हाच मुलाचा बाप (१९१६) (६) समर्थ भिकारी (१९१६) (७) लयाचा लय (अुर्फ 'नरकेसरी' १९१९) (८) संन्यासाचा संसार (१९१९) (९) सत्तेचे गुलाम (१९२२) (१०) तुरुंगाच्या दारात (अुर्फ पतितपावन -१९२३) (११) नवा खेळ (१९२४) (१२) करग्रहण (१९२७) (१३) करीन ती पूर्व (१९२७) (१४) सोन्याचा कळस (१९३२) (१५) जागती ज्योत (१९३२) (१६) स्वयंसेवक (१९३४) (१७) समोरासमोर (१९३७) (१८) कोरडी करामत (१९३८) (१९) त्याची घरवाली (१९३८) (२०) भाग्याचा भगवंत (१९३९) (२१) अुडती पाखरे (१९३९) (२२) रंगभूमीच्या वाटेवर (१९४१) (२३) माझ्या कलेसाठी (१९४१) (२४) सारस्वत (१९४१) (२५) चला लढाईवर (१९४१) (२६) न मागता (१९४४) (२७) सिंगापुरातून (१९४४) (२८) संन्याशाचे लग्न (१९४५) (२९) धरणीधर (१९४६) (३०) खेळघर (१९४८) (३१) जिवाशिवाची भेट (१९५०) (३२) दौलतजादा (१९५०) (३३) भूमिकन्या सीता (१९५०) (३४) तिलाच ते कळते (१९५१) (३५) द्वारकेचा राजा (१९५२) (३६) अपूर्व बंगाल (१९५३) (३७) लंकेची पार्वती (१९५३) (३८) रविंद्रनाथ टागोरांची सात नाटके (भाग १,२) (अनुवादित - १९६२)

**लघुनाटके (त्रोटके) :**

(१) वज्रकुसुम (१९१३) (२) आजचे संवाद (१९३०) (३) पापी पुण्य (१९३१) (४) संसार (१९३२) (५) नामानिराळा (१९३३) (६) सदा बंदिवान (१९३३) (७) तुफान (१९३४) (८) कडकलक्ष्मी (१९४५) (९) जागलेली आई (१९५०) (१०) नवा जमाना (१९५१) (११) चंद्रचकोरी (१९५१) (१२) एकाच घरात (१९५२) (१३) नवा बैरागी (१९५३) (१४) अनुराधा (१९६०) व 'वरेरकरांच्या एकांकिका (भाग १ ते ३)

वरील नाट्यलेखना व्यतिरिक्त वरेरकरांच्या इतरही आणखी काही नाटकांबद्दलचे अुल्लेख त्यांच्या 'नाटकी

संसारा' तून आणि नाटकांच्या पुस्तकांवरील जाहिरातींतून आढळतात. परंतु त्यांची छापील पुस्तके अुपलब्ध नाहीत-

**ती नाटके अशी :**

१) परतल्यावर २) कृष्णकामिनी ३) प्रेमाचा खेळ ४) लढाईनंतर ५) शूद्र की भास ६) रंकाचे वैभव ७) सेनानी ८) श्रेय कुणाचे ? ९) बिल्बमंगल १०) सेविका (एकांक) ११) पायाचे दगड

एवढ्या प्रचंड प्रमाणावर नाट्यलेखन करणाऱ्या वरेरकरांच्या नाटकांतील स्त्रीदर्शनही तेवढेच विस्तृत आहे. अुपलब्ध नाटकांच्या पुस्तकांनुसार त्याचा आढावा दोन भागात घेता येईल. **१) नाटकांतून दिसणारे स्त्रियांचे विविध प्रकार २) त्या स्त्रियांचे नाटकांतील कार्य** - स्त्रीदर्शन विस्तृत प्रमाणावर असल्याने सोयीसाठी त्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल-

**१) स्त्रियांचे, स्त्री-पात्रांचे विविध प्रकारे (Type)**

कालमानानुसार नाटकांच्या विषयानुरुप असे तीन भाग करता येतील.

**१) पौराणिक २) ऐतिहासिक ३) सामाजिक**

सुरुवातीस वेगवेगळ्या प्रकारच्या स्त्रियांची जंत्री करता येईल. यात स्त्रीची वयानुरुप 'किशोरी, कुमारिका, अुपवर कन्यका, विवाहिता, वयस्कर (वृद्धा)' अशी विविध रुपे तर आहेतच, त्याशिवाय 'भगिनी, कन्या, भार्या, माता, स्नुषा, सासू -' अशी नात्यांची विविधताही आहे.

**पौराणिक स्त्रिया :**

अ) राजस्त्रिया - सीता, अुर्मिला (भूमिकन्या सीता) शर्मिष्ठा (संजिवनी) दक्षकन्या सती (लयाचा लय) सुभद्रा व रुक्मिणी (संन्यासाचे लग्न), रुक्मिणी व अश्विनी (द्वारकेचा राजा) सावित्री (वरवर्णिनी), प्रसृती (लयाचा लय)

ब) ऋषिकन्या - देवयानी (संजीवनी)

क) सेविका, दासी इ. - वासंती, कुशिका (भूमिकन्या सीता) सुनीता (द्वारकेचा राजा)

ड) तपस्विनी - सरी (लयाचा लय), निवेदिता (समर्थ भिकारी)

इ) कुब्जा, राधा (पुन्हा गोकूळ), राधा, ललिता इ. (कुंजविहारी)

**२) ऐतिहासिक स्त्रिया :**

वरेरकरांनी 'करीन ती पूर्व' हे एकच ऐतिहासिक नाटक लिहिले. त्यातील जिजाबाई, गजरा, पुतळा ह्या स्त्रियां या वर्गात येतील.

**३) सामाजिक नाटकांतील स्त्री-दर्शन :**

समाजिक नाटकांची संख्या जास्त असल्यामुळे वरेरकरांनी त्यांतून केलेले स्त्रीदर्शन समजण्यासाठी, त्यांची वेगवेगळ्या प्रकारची वैशिष्टये लक्षात येण्यासाठी, सोयीसाठी खालीलप्रमाणे वर्गवारी करता येईल-

अ) **वय** - 'चंद्रचकोरी ' मधल्या किशोरवयीन 'किशोरी' पासून, अुपवर कन्या (उ. मंजिरी, 'हाच मुलाचा बाप') विवाहित गृहिणी (उ. 'सुधा' - तुरुंगाच्या दारात) वयस्क स्त्रिया, माता (उ. शारदेश्वरी - अपूर्व बंगाल) असा वयानुरुप वेगळेपणा वरेरकरांच्या नाटकांतील स्त्रीदर्शनांत आढळतो.

ब) **जात** - वेगवेगळ्या जातीच्या स्त्रिया याप्रमाणे दिसून येतात. उदाहरणार्थ - सुचेता / अबला / शारदेश्वरी (बंगाली) जिनी ('प्रहार' - तुरुंगाच्या दारात) जोहरा (मुसलमान - तुरुंगाच्या दारात), मंगला (मराठा - तिलाच ते कळते), हंसा (गुजराथी - सोन्याचा कळस), मालन (बाटलेली, धर्मांतरित ख्रिश्चन - संन्याशाचा

संसार), कुलजीत ('प्रजापती लंडन' एकांक) इ.

क) **धर्म** - विविध धर्माच्या स्त्रिया याप्रमाणे -

मुसलमान (जोहरा - तुरुंगाच्या दारात)

धर्मांतरित ख्रिश्चन

(मालन-संन्याशाचा संसार) वैष्णव (निवेदिता - समर्थ भिकारी)

ड) **प्रांत** - विविध प्रांताच्या स्त्रियाप्रमाणे-

पंजाब (कुलजीत - प्रजापती लंडन एकांक)

गुजराथ (मीना - तिच्या नवऱ्याचे माहेर, एकांक)

बंगाल (शारदेश्वरी, सुचेता, अबला - अपूर्व बंगाल)

इ) **समाजांतील स्थान** - (पेशा, हुद्दा, अधिकार असलेल्या)

वरेरकरांच्या नाटकांतील अनेक स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने अनेक क्षेत्रात कामे करीत असलेल्या आढळतात. 'स्त्री - शिक्षण आणि समान हक्क' यांचे दर्शन त्या स्त्रियांच्या समाजांतील स्थानांवरून लक्षात येते.

पोलिस सुपरिन्टेंडेन - (लक्ष्मी-'नवा जमना' एकांक)

मॅजिस्ट्रेट - (सावित्री 'नवा जमाना' एकांक)

सरन्यायाधीश - (कामिनी - 'नामानिराळा' आणि सुलभा समोरासमोर)

प्रोफेसर (जया - 'नवा बैरागी' एकांक)

सिनेतारका (चिंगी अुर्फ विधुमुखी - 'समोरासमोर')

नर्स (रेवा - 'सत्तेचे गुलाम आणि कामिनी, चंदा- 'नामानिराळा' एकांक)

फ) **कुरुप किंवा रुपाचे वरदान नसलेल्या स्त्रिया-**

'सर्वसाधारणपणे नाटकांतील नायिका ही सुस्वरुप असते' हा अलिखित दंडक मोडणाऱ्या काही स्त्रिया वरेरकरांच्या नाटकांतून दिसतात. त्या पौराणिक आणि सामाजिक नाटकांतील स्त्रिया याप्रमाणे -

कुब्जा ('पुन्हा गोकूळ' एकांक)

सावित्री ('वरवर्णिनी')

मंगला (तिलाच ते कळते)

क) **सुशिक्षित स्त्रिया** - वरेरकरांच्या नाटकात फार मोठ्या संख्येने सुशिक्षित स्त्रिया आढळतात -स्त्री-शिक्षणाबद्दलचे वरेरकरांचे सुधारकी विचार या सुशिक्षित स्त्रियांच्या संख्येवरुन लक्षात येअू शकेल. त्या सुशिक्षित स्त्रियांची यादी खालीलप्रमाणे -(यादी संक्षिप्त आहे.)

लक्ष्मी पार्वती सावित्री (नवा जमाना), नीरा (खेळघर), नलिनी, क्षमा (सत्तेचे गुलाम), पार्वती, हेमा (लंकेची पार्वती), सुलभा, सुषमा, सुमित्रा (सारस्वत), कल्याणी, रमणी, रजनी, कुंदा, मंदा (माझ्या कलेसाठी), पिरोज, मणि (कोरडी करामत), शालिन कमला, श्रीमती (अुडती पाखरे), इंदू (जागलेली आई), सुलभा, चिंगी, अंजली (समोरासमोर), अभया, मीना (तिच्या नवऱ्याचे माहेर), अरुणा, रेणू, अणिमा (सदा बंदिवान), किशोरी, दुलारी (संन्याशाचा संसार), सुचेता, अबला (अपूर्व बंगाल), कुंदा, विजया, वरदा (जागती ज्योत), जया, सुधा, सुमन (नवा बैरागी ), प्रियवंदा (शुभमंगल), चकोरी (चंद्रकोरी) इ.

ख) **अशिक्षित स्त्रिया** - वरेरकरांनी केवळ सुशिक्षित स्त्रियांचाच विचार न करता, अशिक्षित स्त्रियांचाही विचार केला होता. वेळप्रसंगी अशिक्षित स्त्री देखिल केवढा विचार करु शकते हे त्यांनी 'स्वतःचे सौभाग्य

स्वराज्यासाठी दान करणाऱ्या 'गजरे'तर्फे (करीन ती पूर्व) दाखवून दिले होते. त्याशिवाय कामगारांच्या हक्कासाठी मजूरचळवळीत उतरणारी 'बिजली' (सोन्याचा कळस) ही अशिक्षितच होती. 'आजवर मी कशासाठी नाचत होते? कुणासाठी माझी कला होती?' हा विचार करणारी मूळची अशिक्षित पण नंतर नृत्यकला शिकलेली 'गौरी' (दौलतजादा) आणि स्वतःची साऱ्या कुटुंबाची अन्नान्‌दशा असतानाही आपल्या मुलीच्या (मंदा) लग्नाचा सौदा करायला नकार देणारी 'रेणुका' (जिवाशिवाची भेट) ही अशिक्षितच ! जुलमी वेठबिगारीला आपल्या मुलाचा बळी जातो आहे हे पाहून कळवळणारी 'बायजा' (स्वयंसेवक) काय किंवा रस्त्यावरून गाणे म्हणीत फिरणारी 'जिनी' (तुरुंगाच्या दारात) देखील अशिक्षितच - अशिक्षित असूनही त्यांच्या मनात स्त्री परस्वधीनतेबद्दल, समाज रुढींच्या परंपरागत कुंपणांबद्दल असंतोष खदखदत होताच.

ग) **विवाहित स्त्रिया-**

'स्त्री पारतंत्र्याच्या समस्या' विवाहित आणि अविवाहित दोन्ही स्त्रियांना सारख्याच भोगाव्या लागत होत्या. लग्न होऊन संसारात पडल्यावर नवऱ्याच्या आज्ञेत आणि मर्जी सांभाळण्यातच सर्वसामान्य स्त्री गुरफटून जात होती. याशिवाय विवाहित स्त्री म्हणून तिला घरात आणि घराबाहेर अनेक बंधने होती. त्यांचा विचार वरेरकरांनी आपल्या नाटकातील अनेक विवाहित स्त्रियांद्वारे केलेला दिसतो. नौखालीच्या दंग्यात आपल्या नवऱ्याच्या भ्याडपणामुळे गुंडाच्या तावडीत सापडून बलात्कारित झालेली 'अबला'(अपूर्व बंगाल). वनवासात पतीला साथ देणारी परंतू लोकापवादाने स्वतःच्या पतीने त्याग केल्यावर एकाकीपणाचे दुःख गर्भारपणी भोगणारी 'सीता' (भूमिकन्या सीता), वनवासात, स्वतःच्या पत्नीचा विचारसुद्धा न करता सहभागी होणारा आपला पती पाहून व्यथित होणारी व चौदा वर्षे एकाकीपणे काढणारी 'उर्मिला' (भूमिकन्या सीता). आपल्या स्वार्थापलीकडे स्त्री म्हणून आपली काहीही दखल न घेणारा पती पाहून गृहत्यागाला सिद्ध होणारी 'नीरा' (खेळघर), आपल्या विधवा मैत्रिणीच्या विधुर श्रीमंत वडिलांशी लग्न करुन कौटुंबिकसुख गमावलेली 'पार्वती' (लंकेची पार्वती), 'बायको म्हणजे शून्य आणि पुरुष म्हणजे एकाचा आकडा - त्या आकड्याशिवाय शून्याला काही किंमत नाही' हे कळून चुकलेली 'सुमित्रा' (सारस्वत), 'लग्न ही एक गुलामगिरीच आहे' हे समजलेली 'कुंदा' (जागती ज्योत), आपल्या जीवावर चैन करुन पुन्हा आपल्यावर सर्वस्व गाजवू पाहणारे पती पाहून जागृत झालेल्या 'चिंगी' व 'सुलभा' (समोरासमोर), अद्वैत प्रेमाचा शोध करतांना 'जारिणी' म्हणून रमण कडून अुपेक्षिली जाणारी 'राधा' (कुंजविहारी). आपल्याप्रमाणे अनेक स्त्रियांशी आपल्या पतीने विवाह केलेला असून आपणा सर्वांनाच फसवले आहे हे कळून चुकलेल्या 'सखू', 'कुलजीत', 'चिमणी' (प्रजापती-लंडन) आपल्या मुलीच्या संमतीखेरीज किंवा तिची विक्री करून लग्नाचा बाजार करु पाहणाऱ्या आपल्या पतीला विरोध करणारी माता 'गिरिजा' (नवा खेळ), श्रीमंतीमुळे ऐदी बनलेली आणि त्यामुळे आपला नवरा 'श्रीमंती' च्या कह्यात गेल्याचे कळल्यावर हळहळणारी 'कमला' (उडती पाखरे) कलेच्या प्रेमापोटी लोकापवादाला तोंड देणाऱ्या 'रजनी', 'रमणी' व 'कल्याणी' (माझ्या कलेसाठी) आपल्या पतीपेक्षा वरच्या हुद्द्यावर, मानाच्या जागेवर गेल्यामुळे, कौटुंबिक तणावाला तोंड देणाऱ्या 'लक्ष्मी', 'पार्वती' व 'सावित्री' (नवा जमाना), विषम विवाहामुळे पती-पत्नीत निर्माण झालेले अंतर त्रासदायक वाटणारी 'कृपा' (चला लढाईवर), स्वतःच्या सख्ख्या, निरपराध भावाला पुन्हा तुरुंगात अडकविण्याचा प्रयत्न करणारा नवरा पाहून हताश होणारी पण नंतर बंड करुन उठणारी 'अरुणा' (सदा बंदिवान), अशा अनेक विवाहित स्त्रियांद्वारे, वरेरकरांनी 'पुरुषसत्ताक पद्धती' आणि त्यामुळे विवाहित स्त्री ची होणारी कुचंबणा, तिच्यावरील बंधन यांचे चित्रण केले आहे.

घ) **अविवाहित स्त्रिया-**

वरेरकरांनी आपल्या नाटकांतील अविवाहित स्त्रियांद्वारे अविवाहित स्त्रीवरील बंधने त्यात तिची होणारी कुचंबणा आणि त्यातून मार्ग काढून, जागृत होणाऱ्या, आक्रमक बनणाऱ्या, चालीरीती, धर्म, रुढींची बंधने झुगारणाऱ्या स्त्रियांचे चित्रण केले आहे.

'सत्तेची गुलामी' झुगारुन देऊन, श्रीमंती लाथाडून आपले हातपाय चिखलात बुडवून घ्यायला तयार झालेली 'नलिनी', बिजलीमुळे कामगार जीवनातील दैन्य दुःख हाल अपेष्टांची जाणीव होताच कामगारांच्या वतीने लढायला सिद्ध होणारी 'हंसा' (सोन्याचा कळस) 'पतितपरिवर्तनासाठी' प्रत्यक्ष आपल्यासाठी पतीच्या त्यागाला सिद्ध होणारी आणि 'धर्मापेक्षा माणुसकी ही श्रेष्ठ मानणारी' अशी 'किशोरी' (संन्याशाचा संसार), हुंड्याच्या रुढीप्रिय अशा प्रथेविरुद्ध बंड पुकारणारी 'मंजिरी' (हाच मुलाचा बाप'), वैष्णव धर्माची दीक्षा घेतलेली आणि वैष्णव धर्मासाठी प्राणत्यागालाही तयार होणारी 'निवेदिता' (समर्थ भिकारी), आपल्या भावी पतीच्या अुद्योगधंद्यात पडण्यामुळे इर्षा जागृत होऊन स्वतःची शिवणकाम संस्था उघडणारी 'अंजली' (समोरासमोर), स्वतःला रुपाची देणगी नसल्यामुळे भावी पति दुसऱ्या स्त्रीकडे वळताच स्वतःहून त्यांच्या मार्गातून दूर होऊ पाहणारी 'मंगला' (तिलाच ते कळते) कलाकाराचे खरे रुप न कळल्यामुळे बाह्यरुपावरच फिदा होऊन कोणा कशी कळावी - वेडात काय गोडी' म्हणणारी 'सुषमा' (सारस्वत), जुगारी बापापायी आपल्या आयुष्याचा जुगार खेळणारी 'शालिनी' (उडती पाखरे) आणि लग्नाआधीच आपल्या भावी पतीचे किंवा त्याचीही खात्री नसतांना त्या प्रियकराचे मूल पोटात वाढविणारी 'श्रीमती' (उडती पाखरे), आपला भावी पती अट्टल दारुडा आहे हे कळूनही त्याचा स्वीकार करायला तयार झालेली 'मणी' आणि आपला सख्खा भाऊच दारुडा आहे हे कळूनही त्याच्यावर मायेचे पांघरुण घालून स्वतःचे एकाकी आयुष्य जगणारी 'पिरोज' (कोरडी करामत), आधीपासून लग्न ठरलेल्याशीच, तो तुरुंगवास भोगून आलेला असल्याचे कळूनही लग्न करु पाहणारी आणि त्यासाठी स्वतःच्या घरादाराचा त्याग करणारी 'अणिमा' (सदा बंदिवान) आपण एका नायकिणीच्या पोटी जन्मलेलो असल्याचे कळल्यामुळे, लग्न मोडलेली अशी 'रमा' ( न मागता), बापावेगळी असल्यामुळे काकाचा छळ सहन करुन, आईला मदत करणारी आणि आनंदी वृत्तीने राहून 'मोती' वर प्रेम करणारी आणि लग्नाच्या बाबतीतला कोणताही सौदा नाकारणारी 'मंदा' (जिवाशिवाची भेट), हत्याकांडात विटंबित झालेली आणि त्या परिस्थितीत माणुसकीला आवाहन करणारी 'सुचेता' (अपूर्व बंगाल), आपल्या बहिणीच्या वैवाहिक आयुष्याचा खेळखंडोबा झालेला पाहून स्वतःचे ठरलेले लग्न मोडणारी 'विजया' आणि 'पुरुष वर्चस्वाचा तिटकारा असलेली, फटकळ 'वरदा' (जागती ज्योत),

या अशा प्रकारच्या 'अविवाहित स्त्री' पात्रांद्वारे वरेरकरांनी वेगवेगळ्या अविवाहित स्त्री समस्या, सामाजिक बंधने आणि त्यामुळे जागृत होणारी स्त्री-यांचे चित्रण केले आहे.

न) **घटस्फोटिता** - वरेरकरांनी विवाहति स्त्रियांचे विवाह होऊन विभक्त झालेल्या,घटस्फोटितांचे चित्रणही आपल्या नाटकांतून केले आहे. कौटुंबिक तणाव आर्थिक प्रश्न, सामाजिक प्रतिष्ठा अशा संदर्भात घटस्फोटितांचा विचार वरेरकरांनी केला आहे. पुरुषी वर्चस्वामुळे हे प्रश्न उभे राहतात. 'समोरासमोर' मधील डॉक्टर असलेल्या सुलभाचा पैसा तिच्या पतीला 'त्रिंबकरावाला' हवा असतो. पण या खेरीज स्वतःचे वर्चस्वही त्याला गाजवायचे असते. त्रिंबकराव स्वतः मात्र ४०रु. च्या पगारावर शिक्षक म्हणून काम पहात असतो. इथे-सुलभा आणि त्रिंबकरावात दरी उत्पन्न होते. सुलभा आपली डॉक्टरकी (प्रॅक्टिस) बंद करते. त्यामुळे पैशाचा ओघ थांबतो. त्रिंबकरावांची चैन बंद होते.

स्वार्थी हेतूलाच असा तडा गेल्यावर त्रिंबकराव चिडून सुलभापासून घटस्फोट घेतो. असाच प्रकार 'खेळघर' मधील 'कृष्णा'च्या बाबतीतही होतो. पण दोघीही जिद्दीने, स्वावलंबनाने आल्या प्रसंगाला तोंड देतात. परंपरागत जुलमी पुरुषसत्ताक पद्धतीचे पर्यवसान हे विवाहित स्त्री च्या बाबतीत घटस्फोटामध्ये होऊ शकते. अशा वेळी ती स्त्री खंबिरपणे अुभी राहिली तर 'घटस्फोट' चे संकटही दूर सारु शकते. हे वरेरकरांनी या स्त्रीपात्रांद्वारे दाखविले आहे.

च) **विधवा** - स्त्री जीवनात अकस्मातपणे अुभा राहणारा हा वैधव्याचा प्रश्नही वरेरकरांनी आपल्या नाटकांतील विधवा स्त्री पात्रांद्वारे हाताळला आहे. पतीचे छत्र नाहीसे होताच स्त्री पुढे अनेक प्रश्न उभे राहतात, त्यातला सर्वात महत्त्वाचा पहिला प्रश्न 'अर्थार्जनाचा' असतो. स्त्री जर आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र झाली नाही तर वैधव्याची कुऱ्हाड कोसळताच तिच्या आणि तिच्या बरोबर मुलाबाळांच्या आयुष्याची धुळधाण उडते. यासाठी एकतर स्त्री नोकरी करणारी, सुशिक्षित असावी लागते. अन्यथा तिच्या माहेरची गडगंज श्रीमंती असावी लागते. उ. 'लंकेची पार्वती' मधील 'हेमासारखी'. हे नसल्यास विधवेला अर्थार्जनासाठी घराबाहेर पडावे लागते. 'रेवा' (सत्तेचा गुलाम), 'सुरमा' (नामा निराळा) यांच्यासारखे 'नर्स' होणे हा एक उपाय किंवा 'रेणुके' (जिवाशिवाची भेट) प्रमाणे सासरच्या माणसांवर अवलंबून राहून परस्वाधीन जिणे जगावे लागते. 'शारदेश्वरी' (अपूर्व बंगाल) प्रमाणे मुले मोठी आणि कमावती असली तरी फारसा आर्थिक प्रश्न येत नाही, नाहीतर 'बिजली' (सोन्याचा कळस) प्रमाणे फटकळ, सडेतोडपणे येईल ती परिस्थिती स्वीकारण्याचे धैर्य अंगी बाळगावे लागते. वरेरकरांच्या नाटकातील दोन विधवा सुद्धा वेगवेगळया स्वभावाच्या आहेत. 'नामानिराळा' मधील 'सुरमा' नवरा असूनही त्याच्या निष्क्रियतेमुळे स्वतःला विधवाच समजते तर 'सोन्याचा कळस' मधली 'बिजली' नवरा नसतांनादेखील ठणठणीत कुंकू लावून वावरते.

छ) **अकुलीना, वेश्या इ. स्त्रिया** - वरेरकरांनी इतर अनेक प्रकारच्या स्त्रियांबरोबर, समाजाकडून उपेक्षित असलेल्या अशा स्त्रियांचीही दखल घेतली आहे. अनैतिक संबंधातून जन्म होणाऱ्या अनेक मुली, परिस्थितीनुरुप वाममार्गाला लागलेल्या स्त्रिया, त्यांचे दुःख आणि वेदना इतर स्त्रियांपेक्षा वेगळ्या असतात. आर्थिक प्रश्न फारसा त्रासदायक नसला तरी समाज अशा स्त्रियांचा स्वीकार करीत नाही. वरेरकरांनी अशा काही स्त्रियांची दखल आपल्या अनेक नाटकांतून घेतली आहे. 'तुरुंगाच्या दारात' मधली 'जोहरा' (गायिका, नायकिण), अस्पृश्यतेबद्दल सांगते. 'नामानिराळा' मधील 'रमे' चे जन्मरहस्य उघड होताच तिचा पूर्वनियोजित पती (हेमंत) तिच्याशी लग्न करायला नकार देतो. 'अपूर्व बंगाल' मधील 'अबला' नवऱ्याने टाकून दिल्यावर वेश्यावृत्तीने पण 'आपले शील सांभाळून' (?) राहते. 'नामानिराळा' मधील 'चंदा' नर्स अनेक डॉक्टरांशी अनैतिक संबंध ठेऊन आपल्या नव्या जीवनाशी तडजोड करते. 'पापी पुण्य' मधील, क्षणिक मोहाला बळी पडलेली आणि त्यामुळे नाईलाजाने वेश्याव्यवसाय स्वीकारणारी 'हरणी' या वाममार्गाने महत्त्वाचे कारण सांगून टाकते. 'नवा खेळ' मधली 'चंपा' नायकिण तर 'श्रीधर'ला सारख्या सज्जन माणसावर आपल्यामुळे काय संकटे आली आहेत हे कळल्यावर, स्वतःहून त्याच्यावरचा कलंक दूर करण्यासाठी मदत करते. 'संजीवनी' नाटकातील 'वारुणी' मात्र दैत्यांना दारुचे व्यसन लावण्याचेच काम करते. 'वारुणी' सारख्या अकुलीनेला व्यसनाचेच रुपक देऊन वरेरकरांनी 'अकुलीना स्त्री आणि व्यसने' या दोघांचे संबंध स्पष्ट केले आहेत.

(पुढील अंकात)

**- डॉ. र. म. शेजवलकर**

ठाणे

# कथेची कथा - लेखांक १

*कथेचा विकास कसा झाला व मराठीत गूढ कथा विज्ञान कथेपर्यंत तिचा प्रवास कसा झाला याबद्दलचा हा विशेष अभ्यास. या लेखांसाठी वापरलेल्या संदर्भ साहित्याची सूची शेवटच्या लेखानंतर दिली जाईल. - संपादक*

**प्रकरण १ - कथासाहित्य सर्वसामान्य विवेचना**

आज प्रगत झालेल्या विविध कलांची मुळे ही माणसाच्या विविध मूलभूत प्रवृत्तींमध्ये दिसून येतात. भावनाविष्काराच्या प्रयत्नातून, अनुकृती करण्याचा प्रयत्न माणूस करू लागला. त्यातून नृत्य व नाट्यकला विकसित होत गेली. विचार प्रकट करण्यासाठी भाषा हे साधन प्राप्त होताच माणूस आपले लहान मोठे अनुभव, कल्पना इतरांना गोष्टीतून सांगू लागला. त्यामुळे 'कथनाची' वा 'निवेदनाची' आवड ही माणसाची मूलभूत प्रवृत्ती झाली. आदिमानवाला लागलेल्या अनेक शोधात भाषा व शब्दोच्चार हे शोध अत्यंत महत्त्वाचे होते. किंबहुना मानवी समाजाची एकूणच जडणघडण या शोधामुळे झालेली आहे. स्वरयंत्रातून येणाऱ्या आवाजाला शब्दांनी आकार दिला व मानसिक हावभावांना व्यक्त होण्याकरिता साधन प्राप्त झाले. शब्द हे माध्यम इतर माध्यमांपेक्षा म्हणजे चित्रलिपी, हावभव वगैरे - अधिक प्रभावी होते. एकाच शब्दाचे वेगवेगळे उच्चार करता येऊ शकणे, अंधारातून शब्द, अर्थ व्यक्त करू शकणे अशा शब्दोपयोगामुळे शब्द व भाषा यांनी माणसाच्या प्रकटीकरणाला वाव मिळाला. वस्तुनिर्देश करण्याच्या गरजेतून जरी शब्दनिर्मिती झाली, तरी कालौघात शब्दाला इतर मूल्ये लाभत गेल्याने शब्दाची क्षमता वाढत गेली. या माध्यमातून माणूस आपल्या प्रतिक्रिया नोंदवू लागला. आपल्याला आलेले अनुभव दुसऱ्याला सांगणे व दुसऱ्याचे अनुभव ऐकणे यातून माणसांचा परस्पर संवाद साधला जाऊ लागला. अनुभवाबरोबरच त्या अनुभवांतून भावनाविष्कारासही वाट मिळाली. अर्थात हे परस्परांत होते हे महत्त्वाचे. कोणाही एका व्यक्तीने केलेला भाषा वा शब्दाचा उपयोग हा त्याच व्यक्तीसाठी असण्यात कोणतेही प्रयोजन नव्हते. माणूस इतरांशी संवाद साधत होता - Communicate होत होता व इतरांना काही सांगून इतरांचे अनुभव ऐकण्याची ही त्याची उपजत वृत्ती होती. आज विविध अंगांनी वाढलेल्या ललित साहित्याचा उगमही माणसाच्या या मूलप्रवृत्तीत असल्याचे दिसून येते. किंबहुना आत्माविष्कार ही त्याची समाज जीवनाच्या सुरुवातीची मानसिक गरज होती. ''सुरुवातीला साहित्याने पुरविलेली ज्ञात गरज ही समाज सापेक्ष होती... साहित्यनिर्मिती करणारा हा कधी एकाकी नसतो ... तो त्याची निर्मिती ही कोणत्याना कोणत्या स्वरुपातील समूहासाठी करीत असतो.''

समाजजीवनाच्या सुरुवातीस मानसिक गरज भागविणारे साधन असे ललित साहित्याचे रूप होते. त्यावेळी त्यातील ललित्याबद्दल वा त्याच्या साधनरूपाबद्दल माणसाला कल्पना नसणे हे साहजिकच होते. केवळ 'काही' सांगून आत्मविष्काराच्या धडपडीतून काही सांगितले जात होते व त्याच्या सादप्रतिसादाच्या जाणिवेतून त्यातील आकर्षकतेकडे सांगणाराचे लक्ष कळत न कळत पुरविले जात होते.

कथ्‌ म्हणजे सांगणे या संस्कृत धातुरुपावरुन कथा हा शब्द अस्तित्वात आला तो फार पुढे. आदि कथाही आजच्या रूढ अर्थाने कथा नव्हती तर ती कहाणी होती. *Tale* होती. संवाद साधल्याशिवाय जीवन शक्य नव्हते. या संवाद साधण्याच्या क्रियेत अपरिहार्यपणे प्रतिक्रियाही गृहीत

असते. केवळ सांगून चालत नाही तर त्या सांगण्याची प्रतिक्रिया ऐकण्याने पूर्तता होते. त्यामुळे सांगणे व ऐकणे आणि / किंवा ऐकणे व सांगणे यातून संवाद साधला जात असतो. संवाद साधण्याच्या या मूलप्रवृत्तीतूनच ललित साहित्य व पर्यायाने कथासाहित्य उगम पावलेले असल्याने या मूलप्रवृत्ती इतकीच कहाणी वा कथा, सांगण्या ऐकण्याची वृत्ती सनातन आहे.

संवाद साधण्याच्या या मूलप्रवृत्तीमुळे बहुतेक भाषांतील प्राचीन साहित्याचा पाया, घाट कोणताही असला तरी कथातत्त्व प्रधान असल्याचे दिसते. 'जगांतील विभिन्न भाषीय वाङ्मय तपासले तर त्याचा पाया कथनात्मक असल्याचे दिसून येईल.' अर्थात कथनात्मकता व कथा यातील भेद हा साहित्य प्रकाराच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. कथेच्या सुरुवातीच्या या विचारात कथा ही साहित्य प्रकार या दृष्टीने विचारात घ्यावयाची असली तरी ती उपजत प्रवृत्तीचा एक भाग आहे, हे यावरून दिसून येते कथा व कथनात्मकता यावर पुढे विचार येईलच !

या उपजत प्रवृत्तीला अनुभवामुळे कल्पकतेची जोड मिळत गेली. उपजत प्रवृत्ती प्रत्येकातच असते. पण या प्रवृत्तीपासून योग्य आत्माविष्कार मिळवून देऊ शकेल असे संस्कार प्रत्येकाच्या वाट्याला येत नाहीत. ही उपजत प्रवृत्ती, मूलप्रवृत्ती संस्कारित होणे हे साहित्यनिर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. त्याशिवाय त्या साहित्यात सुंदरता, मनोज्ञता येण कठीण व साहजिकच त्यातील आकर्षकतेचे प्रमाण कमी. ही आकर्षकता टिकविता यावी म्हणून कल्पकतेची जोड दिली जाऊ लागली. अनुभव घेण्याच्या पद्धतीत फरक पडला. केवळ वर्णनाला (Reportage) ला साहित्याचे रूप लाभत गेले. उदा. एका मुक्या स्त्रीच्या मांडीवर तिचे मूल मृत अवस्थेत असल्याचे पाहणे व त्या मुलाच्या वात्सल्यापोटी ढळाढळा रडत असणारी ती आई बोलू लागणे हा एक अवलोकनाचा विषय घेता येईल. असे एखादे दृश्य पाहिल्यानंतर त्याचे केवळ वर्णन व त्या दृश्यावर आधारलेली कथा, कविता यांच्या स्वरूपात फरक असणे साहजिक आहे. धुवाधार पावसात एखाद्या झाडाखाली उभा असणारा म्हातारा - वीज कोसळ्याने झाड पडूनही न मरणे व तोच म्हातारा पाय घसरल्याने निमित्त होऊन मरण पावणे या घटनेच्या वर्णनात व साहित्यरुपातही असाच फरक पडले.

इतिहासपूर्व व सुरुवातीच्या कालखंडात माणूस चाचपडत होता. त्यामुळे या कलाखंडात निर्माण झालेल्या ललित कृतीतून त्याचे नित्य नव्याने येणारे अनुभव, निसर्गचमत्कारांनी भारावलेले मन, विश्वाबद्दल, विश्वोत्पत्तीबद्दल त्याला वाटणारे कुतूहल व्यक्त होते. या ललित वृत्तीतून तो अशाच अनुभवांचे प्रकटीकरण करीत होता. उदा. विश्वोत्पत्तीच्या कथा जगातल्या सर्वच साहित्यात दिसून येतात. वेदातील जातककथातील, बायबलमधील कथासाहित्यात उत्पत्तिकथा दिसून येतात. शतपथब्राह्मणातील 'मनू आणि महापूर' ही कथा या दृष्टीने पाहण्यासारखी आहे. मनू एका छोट्या माशाला त्या माशाच्या सांगण्यावरूनच लहानाचा मोठा करतो व सागरात सोडतो. जलप्रलय येतो. काहीही वाचत नाही. एकटा मनू राहतो. तो माशाच्या सांगण्याप्रमाणे होडीत बसतो व प्रचंड जलप्रलयातही तो मासा मनूला तारतो. हाच मनू यज्ञदेवतेच्या साहाय्याने पुन्हा विश्वनिर्मिती करतो. विश्वोत्पत्तिबरोबरच प्रलयावरही कथा रचल्या गेल्या. 'मी कसा झालो' हे कुतूहल जसे बालकाला तसेच हे जग झाले कसे आणि जाणार कुठे, हे परमेश्वराच्या मानवी बालकाला पडलेले अक्षयीचे कोडे आहे. आणि म्हणूनच उत्पत्तिकथा जुन्या असल्या आणि खरे म्हटले तर मानवाच्याच तरल कल्पनाशक्तीतून व भाविकतेतून त्या निर्माण झालेल्या असल्या तरी त्या सर्वकाळी सर्वांना जवळच्याच वाटतात.

या सुरुवातीच्या मौखिक परंपरेतील कथांच्या निर्मिती स्थानाबद्दल, मूलस्थानाबद्दल अभ्यासकात साशंकता दिसूत येते. मौखिक प्रसारामुळे त्यांच्यात साम्य अधिक दिसून येते. मराठीतील 'राजा धिंगाधिंग माथा शिंग' ही लोककथा व प्राचीन ग्रीक दैवतकथातील राजा मिडासची कथा यातील साम्य उदाहरणादाखल लक्षात घेता येईल. एकाच कल्पनेवर जगाच्या बहुतेक भाषांत कथानिर्मिती होण्याचे कारण लोककथांचा देशोदेशी झालेला प्रसार व आदिमानवाच्या मर्यादित अनुभवातील साम्य यात आहे. 'प्रवासी कथां'च्या प्रत्येक ठिकाणच्या आविष्कारात थोडाफार फरक असला तरी त्यातील बीजरूप अंशातील *(Motrif)* साम्यामुळे कथा साहित्याचा प्रसार व वाढ होत राहिली.

या लोककथांचा एक हेतू जरी मनोरंजन असला तरी तिच्यातील बहुप्रयोजकता हे तिचे एक पुरातन असे वैशिष्टय आहे. उदा. विश्वोपत्तिबद्दल सांगितलेल्या 'मनू आणि महापूर' याच कथेत केवळ विश्वोपत्तीचा वेध घेणे एवढेच प्रयोजन नाही तर याच कथेतून ईश्वर सर्व प्राणिमात्रात भरला आहे हे तत्त्वही सूचित होते. धर्मप्रसार, तत्त्वप्रतिपादन, कुतूहलपूर्ती अशा विविध प्रयोजनांची कथाविष्काराला जोड मिळत गेली व कथा साहित्याचा विस्तार वाढू लागला.

**ललित साहित्य : समाज प्रवृत्ती**

कथा हा साहित्य प्रकार माणसाच्या मूलभूत वृत्तीशी कसा निगडित आहे, प्राचीन काळी मौखिक परंपरेत निर्माण होऊन वाढीस लागलेल्या या साहित्य प्रकारचे सर्वसामान्य स्वरूप काय हे पाहिल्यानंतर कथा या साहित्य प्रकारची 'साहित्य प्रकार' या दृष्टीने सर्वसामान्य विचाराची दिशा विचारात घेणे उचित ठरेल. हा विचार कथा व इतर साहित्य प्रकारांतील समान प्रवृत्ती इतर साहित्य प्रकारांचे थोडक्यात स्वरूपवर्णन कथेच्या व्युत्पत्तिविचार, विशेष वगैरे मुद्यांच्या आधाराने करता येईल. यापैकी सर्वच साहित्यातील समान प्रवृत्ती कोणती हा विचार प्रथम येईल.

मानवी आयुष्याची उभारणी संघर्षावर झालेली आहे. जीवशास्त्रातील डार्विनच्या सिध्दांतातही संघर्षात तग धरणाराच जगण्यास लायक ठरतो. संघर्षाची प्रचिती देतो. जगत असलेल्या जीवनानुभवांचा आविष्कार ललित साहित्यातून होतो व या जीवनानुभवांचा बराचसा भाग संघर्षयुक्त असतो. त्यामुळे साहित्यातून अनुभवलेला संघर्ष व्यक्त होणे हे साहजिकच होय ! या संघर्षाचा आढळ सर्व साहित्यात या ना त्या स्वरूपात दिसून येतो. अर्थात नेहमीच्या ढोबळपणे संघर्ष निर्देशिता येईलच असा नसतो. या संघर्षातील दोन परस्पर विरोधी घटकांचे वर्गीकरण मुख्यतः दोन व्यक्तीतील व्यक्ती व समाज यातील आणि व्यक्तीच्या मनातील अंतर्गत मानसिक संघर्ष असे करता येते. साहित्याच्या सर्व प्रकारातून संघर्षाचे प्रतिबिंब प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे आपणास दिसते. त्यामुळे असे म्हणता येईल की संघर्ष ही सर्व साहित्यप्रकारांना व्यापून असणारी समान प्रवृत्ती आहे.

साहित्यातून मिळणाऱ्या आनंदाला कारणीभूत होणारा अनुभव हा मूलतः दोनच प्रकारचा असतो. 'सुखात्म व शोकात्म.' 'शोकान्तिका' व 'सुधान्तिका' हे दोन शब्द नाटकाच्या अंतिम पर्यवसनाला अनुलक्षून वापरण्याची रूढी आहे. परंतु या शब्दांचा अर्थसंकोच करणे होय '' ते (शोकान्तिका व सुखान्तिका) जीवनानुभवाचे विशिष्ट अविष्कार आहेत' व म्हणूनच 'एखादी लघुकथा, कादंबरी, काव्य हे ही शोकात्म व सुखात्म असू शकते.' म्हणजेच 'शोकात्म' वा 'सुखात्म' जाणीव ही केवळ नाटक या साहित्यप्रकाराशी निगडित नसून साहित्याच्या सर्व प्रकारातून आढळून येणारी ती समान प्रवृत्ती आहे.

व्याप्तिसंकोचाचे दुसरे उदाहरण म्हणजे 'काव्य शब्द' होय ! काव्य, कविता, पद्य या तीन शब्दार्थांबद्दल

सर्वसामान्यतः माणसाच्या मनात घोळ असलेला दिसून येतो. ‘कविता’ या साहित्य प्रकाराचा समानार्थी शब्द म्हणून ‘काव्य’ हा शब्द वापरणे यात व्यप्तिसंकोच दिसून येतो. संस्कृत साहित्यशास्त्र पंडित जगन्नाथ याने काव्य व पद्य यात कोठेही गल्लत न करणारी काव्याची स्पष्ट व्याख्या केली आहे. त्याच्या सांगण्यानुसार **‘रमणीयार्थ प्रतिपादकः शब्दः काव्यम्’** असे असल्याने ज्या शब्दसंहितेतून रमणीय अर्थाचे संवाहन होऊ शकतो. अशा शब्दसंहितेत काव्य असल्याचे जाणवू शकते. ती शब्द संहिता केवळ पद्यात्म असावयास हवी असे नाही. तसे असते तर इतर साहित्य प्रकारातून आविष्कृत होणारा, मनाला जाणवणारा रमणीय अर्थ म्हणजे काय हा प्रश्न पडला असता. पण जेव्हा शि. म. परांजप्यांच्या निबंधातील काव्यात्मकता, गंगाधर गाडगीळांच्या तलावातील चांदणे या कथेतील काव्य, अशा शब्दात या रमणीय अर्थाचे प्रकटीकरण करता येते तेव्हा पद्यात्मकता हे काव्याचे व्यवच्छेदक लक्षण नसून काव्य ही साहित्याच्या सर्व प्रकारांत दिसून येणारी समान प्रवृत्ती आहे हे स्पष्ट होते.

सुरुवातीलाच स्पष्ट केल्यानुसार काही तरी सांगून communicate करणे ही माणसाची उपजत वृत्ती आहे. काही सांगण्याच्या(कथ्-सांगणे, निवेदिणे) या उपजत प्रवृत्ती मुळे आविष्काराचा प्रकार कोणताही असला तरी त्यातील वरील हेतू मुळे त्यात कथानात्मकता ही या ना त्या स्वरूपात होती. म्हणजेच कथात्मकता ही देखील सर्व साहित्य प्रकारांतील समान प्रवृत्ती आहे. कथा हा साहित्य प्रकार अभिव्यक्त स्वरुप, परिणामकारकता व बाह्यरचनेच्या तंत्राचे कालौघात होत गेलेले संकेत यांच्यातून विकास पावलेला आहे. कथनात्मकता ही फक्त कथेत असण्याचे कारण नाही. मराठी साहित्यापुरताच विचार केला तर आद्य ग्रंथनिर्मिती करणाऱ्या महानुभवांचे पंचवार्तिक, सारख्या ग्रंथांचा अपवाद वगळता गद्य, ग्रंथ, महदंबेच्या घवल्यांपासून ते पंडित कवितेतील स्वयंवर आख्यानांपर्यंतच्या स्वयंवर आख्यानांतून दिसून येणारी कथा मूल्ये, पोवाडा लावण्या या शाहिरी प्रकारातील कथात्मकता ) उदा. तुळशीदासाच्या सिंहगडच्या पोवाड्यात सिंहगड लढाईची सर्व कथा गद्यातील उताऱ्यांसह सांगितलेली आहे.) तुकाराममहाराज, बहिणाबाई आदी संतांच्या अभंग व इतर रचनांतून दिसून येणारी कथामूल्ये ही लक्ष्यणीय आहेत. पोवाड्यातील कथात्मकतेबद्दल, ‘‘कथा-कथनाचा वेग पोवाड्यामध्ये इतका प्रचंड असतो की कथानक एका क्षणात एक ठिकाणचे दुसऱ्या ठिकाणी एका रसातून दुसऱ्या रसासारखे धावते-फिरते राहते.’’ इतका स्पष्ट उल्लेख आढळतो. किंबहुना ‘जुन्या मराठींतील जी कथात्मक कविता आहे ती कविता त्यावेळी पद्यातच सगळे सांगावयाचे या जनसामान्य प्रथेमुळे लिहिली गेली असण्याचा संभव आहे. कित्येक वेळा त्यातील अनुभव कवितेच्या रूपात गुदमरलेला वाटतो. त्यावेळी अशी प्रथा नसती तर लघुकथेचा अवतार होण्याची शक्यता होती.

**इतर साहित्य प्रकार व कथा :**

**कादंबरी** : - ‘कथा व कादंबरी’ हे दोन्ही निवेदनात्मक वाङ्मय प्रकार असून त्यांचे घटकही सारखे असतात. पण त्यात संघटना भेद आहे. कथेतील अनुभव हा एकविध, एकपिंडी, एक केंद्री असावा लागतो तर कादंबरीतील अनुभव हा बहुविध, अनेक केंद्री असतो.

कथा व कादंबरीतील प्रमुख भेद त्यातील विस्तारामुळे प्रामुख्याने लक्षात येतो. कादंबरीचा आवाका खूपच विस्तृत तर कथा ही त्या मानाने आटोपशीर असते. कादंबरी या प्रकाराचे वाचकाला असणारे आकर्षण हे इतर प्रकारांच्या तुलनेने अधिक असते. याचे कारण कादंबरीच्या विशेषांमध्ये दिसून येते. यापैकी महत्त्वाचा विशेष म्हणजे कादंबरीचा मनावर होणारा परिणाम हा बहुपेडी, संमिश्र व दीर्घकालीन असा असतो. याचे कारण कादंबरीतील

चित्रणाचा आवाका, प्रसंग, व्यक्तीवर्णनातील गुंतागुंत व कादंबरी विचारात घेता असलेला जीवनाचा विस्तीर्ण पट्टा हे स्वरूपविशेष होत ! श्री. ज. जोशींच्या 'आनंदी गोपाळ' या कादंबरीचा या संदर्भात विचार करता येईल. वाचनोत्तर तिचा मनावर होणार परिणाम हा संमिश्र स्वरूपाचा आहे. यात आनंदीबाई गोपाळराव यांचे वैवाहिक जीवन, तत्कालीन समाजस्थिती, समाजाची शिक्षणाकडे व विशेषतः स्त्री शिक्षणाकडे पाहावयाची दृष्टी, आनंदीबाईचे परदेशातील वास्तव्य, या दोघांच्या अनुभवविश्वात येणाऱ्या विविध व्यक्ती, गोपाळरावांचा मृत्यू, अशा अनेकविध संकुल घटनाप्रसंग व व्यक्ती यांचा संबंध पोचतो. त्यामुळे या दोघांच्या आयुष्याचा वर्णनाकरिता लक्षात घेतलेला भाग त्याचा आवाका यांचा विस्तार परिणामाच्या व बाह्याकाराच्या दृष्टीने मोठा होतो.

संस्कृत शब्दार्थाप्रमाणे कादंबरी म्हणजे मद्य हे नाव का पडले याची कारणमीमांसा विशेष स्पष्ट नाही. संस्कृतातील बाणभट्टाच्या 'कादंबरी' नावाच्या गद्य, कल्पित कथात्मक ग्रंथावरून ज्या ग्रंथात गद्य, कथात्मक साहित्य आहे तो ग्रंथ म्हणजे कादंबरी अशी एक मीमांसा आढळते. इंग्रजी साहित्य व साहित्य प्रकारांच्या परिचयानंतर *Novel* वरून 'नावल' हा शब्द सुचविला गेला पण तो रूढ होऊ शकला नाही.

कादंबरीच्या व्याख्यांचा विचार करू जाता पाश्चात्य व पौर्वात्यांपैकी बहुतेकांनी कादंबरीच्या विस्ताराचा, काल्पनिकाचा व गद्य स्वरूपाचा निर्देश केलेला दिसतो. यापैकी काही व्याख्या-

1. An extended fictional narrative in prose

2. Any ficitious prose work over fifty thousand words will be a novel.

3. 'उपन्यास' मनुष्यके वास्तविक जीवन की काल्पनिक कथा है ।

४. जीवनाचे कलात्मक व विस्तृत गद्य चित्र म्हणजे 'कादंबरी'.

५. कार्यकारण शृंखलाबद्ध अशा कल्पित कथानाकाच्या द्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललित गद्य कथा म्हणजे कादंबरी.

**नाटक** : कथेप्रमाणेच नाटकातही मानवी जीवनाचे दर्शन असते व नाटकात विशिष्ट आकारातून व्यक्त होणारी कथावस्तू असते, एवढेच नाटक व कथा यातील साम्य सांगता येईल. नाटकाच्या अलिकडील काळातील एकांकिका या प्रकाराशी थोडे अधिक साम्य आहे, ते म्हणजे एक संस्कारित्वाच्या (Unity of impression) संदर्भात रूढार्थाने नाटक हा केवळ साहित्याचाच भाग नसून ती दृक्श्राव्य कला असल्याने इतर साहित्य प्रकार व नाटक यात मूलतः भेद आहे. इतर साहित्यप्रकारांप्रमाणे नाटकाची अनुभूती ही व्यक्तीगत जाणिवेच्या पातळीवर तर असतेच, शिवाय ती समूह सापेक्ष, समूहगतही असते. नाटकाच्या केल्या गेलेल्या विविध व्याख्या विचारात घेताही नाटक हे मूलतःच अभिनय कला असल्याचे दिसून येते. त्यामुळे नाटक व रंगभूमी यांचा संबंध अविभाज्य आहे, किंबहुना नाटकात जर प्रयोगमूल्ये नसतील तर त्या संहितेतील नाटकात नाटकपण नाही असेही म्हणता यावे, इतका हा साहित्यप्रकार दृक्श्राव्य आहे. नाट्यसंकल्पनेचे स्पष्टीकरण करीत असता, भरतानेही नाट्यपरिणाम, अभिनय आणि लोकस्वभाव या गोष्टींना महत्त्व दिले आहे. नाटकाच्या या स्वरूपामुळे इतर साहित्य प्रकारात असतो तसा केवळ लेखक वाचक संबंध नसतो, तर लेखकाला नट, दिग्दर्शक, प्रेक्षक, इतर तंत्रज्ञ या सर्व घटकांचा विचार करून संवादाच्या माध्यमातून सांगावयाचे असल्याने या साहित्य प्रकारावर पडणारी बंधने अधिक असतात.

**व्याख्याः** 1. It (Drama) designates a play, written for interpretation by actors.

2. Drama is the art of expressing ideas about life in such a manner as to render that expression capable of inter pretations by actors, and likely to interest an audience assembled to hear the words and witness the action.

३. **नाट्यंभिन्नरुचेर्जनस्य बहुधात्मेकं समाराघवम्** (भिन्न भिन्न रुचीच्या आणि मनोवृत्तीच्या व्यक्तींना एकाच वेळी रंजविण्याचे नाटक हे एकच साधन होय!)

**कविता :** 'कथा' आणि 'कविता' हे साहित्याचे दोन मूलभूत प्रकार आहेत. या साहित्यप्रकारातून व्यक्त झालेल्या अनुभवाचे स्वरूप एकात्म, एकपिंडी असते. भावकाव्य व कथा या संपूर्ण भावनात्मक पातळीवर राहू शकतात. सुरुवातीपासूनच या दोन प्रकारांच्या कक्षा एकमेकात मिसळलेल्या आहेत. वेदातील सूक्ते, विनायकांची चिलीम सारखी कविता, वर एका ठिकाणी आलेल्या उल्लेखाप्रमाणे पोवाडे वगैरे पद्य साहित्यातील कथामूल्ये व कातरवेळ (अरविंद गोखले), तलावातले चांदणे (गंगाधर गाडगीळ), समुद्राची देणगी (आचार्य अत्रे) अशा कथातील काव्य पाहता वरील विधानाची सत्यता पटते.

असे साम्य या दोन प्रकारात दिसून आले तरी यात भेदही बराच आहे. व्यक्त होणाऱ्या अनुभवाची जात, आविष्कार पद्धती व भाषा यांत हा फरक असल्याचे जाणवते. कथेतून अनुभव हा कथन केला जात नाही तर तो आविष्कृत केला जातो. तो कवीचा आत्मविष्कार असतो. त्यामुळे कथन वा निवेदन हा कथेतील आवश्यक घटक असतो. कथा काव्यातील लक्षणीयता लक्षात घेतली तरी सुद्धा त्या कवितेचे स्वरूप भावप्रत्ययी असते. काव्याची जाणीव निर्माण होत असता कविता भावनाना आवाहन करते. या उलट कथेत जरी काव्य असले तरी कथेत स्थल, घटना, पात्रे व प्रसंग हे कथेचे आवश्यक परिणाम असते. या परिणामामुळे कथेतील कल्पनासंबंधाची मांडणी तर्कानुसारी होते कवितेत आत्मविष्कार असल्याने हे परिणाम कवितेत नसते.

**लघुकादंबरी :** लघुकथप्रमाणे लघु कादंबरीची लोकप्रियता वाढली आहे. लघुकादंबरी व दीर्घकथा हे दोन प्रकार एकच आहेत. किंवा काय? हा प्रश्न साहित्य प्रकारांच्या विवेचनात उपस्थित केला जातो. लघुकादंबरीचे लघुत्व व दीर्घ कथेचा दीर्घपणा हे वास्तविक बाह्याकाराशीच संबंधित आहेत. कादंबरी लघु असली तरी ती कादंबरी असते हे महत्त्वाचे. त्यामुळे लघुकादंबरीतही 'वेगवेगळ्या घटकातून रचलेल्या अनुभवांच्या अनेक स्वायत्त संघटना असतात. या संघटना अर्थातच परस्परांशी संबद्ध असतात. त्यामुळे कादंबरीत अनेक कथाबीजे असतात. त्याचप्रमाणे लघुकादंबरीबाबतही हेच दिसून येते.

'दीर्घकथा' ही दीर्घ असली तरी ती केवळ आकारानेच तिचे स्वरूप हे लघुकथेनुसार स्वभावतःच बांधेसूद आणि एकात्म, एकसंस्कारित्याने युक्त असे असते. तसेच कादंबरीप्रमाणेच लघुकादंबरी ही संपूर्णपणे भावनात्मकतेच्या पातळीवर राहू शकत नाही. याउलट दीर्घकथा मात्र लघुकथेप्रमाणेच भावनेच्या पातळीवर राहू शकते.

**कथा :** 'कथा' या साहित्यप्रकाराचे इतर साहित्य प्रकाराहून असलेले निराळेपण आतापर्यंतच्या साहित्य प्रकारांच्या तुलनेत थोडक्यात दाखविले. या प्रकरणाचा विषय हाच कथा हा साहित्यप्रकार असल्याने कथेच्या व्याख्येचा, व्युत्पत्तिचा, स्वरूपाचा, प्रकाराचा वगैरे सर्वच विचार येथे करावयाचा आहे. आता पर्यंतचे या संदर्भातील विवरण हे केवळ पार्श्वभूमी पर आहे. त्यामुळे कथेचा विचार निराळा मांडणे हेच उपयुक्त होय !

**व्याख्या :** कोणत्याही साहित्य प्रकाराची व्याख्या ही शास्त्रीय व्याख्येप्रमाणे अचूक नसून त्या व्याख्येतून त्या प्रकारचे, वृत्ती / प्रवृत्तीचे एखादेच वैशिष्ट्य किंवा काही वैशिष्ट्ये (की जी त्यावर प्रकाश टाकू शकतील.)

सांगितलेली असतात. त्यामुळे इतर साहित्य प्रकाराप्रमाणेच कथेची अमूकच व्याख्या सांगता येत नाही. अनेक लेखकांनी त्यांना जाणवलेले स्वरूप व्याख्येत सांगावयाचा प्रयत्न केलेला असतो, त्यामुळे कथेच्या अनेक व्याख्या केलेल्या दिसतात. येथे संस्कृत, इंग्रजी, हिंदी साहित्यात केलेल्या एकेक व्याख्या विचारात घेतल्या आहेत. त्या कोणत्याही अर्थाने प्रतिनिधित्व किंवा प्रमाण (Standard) म्हणता येणार नाही.

**अमर** : आपल्या सारसुंदर या ग्रंथात अमराने 'प्रबन्धकल्पना कथा' अशी एक व्याख्या केलेली आहे. त्याच्या व्याख्येचे विश्लेषण - ''**प्रबन्धस्य अभिधेयस्य कल्पना स्वयं रचना**' असे केलेले असून त्याचा अर्थ प्रबंधाची अर्थात जे अभिधेय (सांगण्यासारखे) असेल त्याची कल्पनेने स्वतः केलेली रचना (म्हणजे कथा) असा होतो.

**एडगर ॲलन पो** - It is a piece of fiction dealing with a single incident, material or spiritual, that can be read at one sitting; it is original; it must sparkle, excite, or impress; and it must have unity of effect or impression. It msut move in an even line from its exposition to its close. एडगर पो च्या व्याख्येत कथेच्या मनावरील संस्कारातील एकात्मता व कथेतील या एकात्म संस्काराची (Unity of inpression) क्षमता यांचा निर्देश केलेला दिसतो. या व्याख्येशिवाय इतरही अनेक ठिकाणी त्याने कथेच्या व्याख्या केलेल्या दिसतात.

**प्रेमचंद** : अनुभूतियांही रचनाशील भावनासे अनुरंजित होकर 'कहानी' बन जाती है ।

मराठीत व्याख्या करावयाचे जे प्रयन्त झाले त्यातील ना. सी. फडक्यांनी केलेली व्याख्या ही त्यातल्या त्यात प्रमाण असल्याने बहुतेक ठिकाणी तीच व्याख्या उध्दृत केलेली दिसून येते. उदाहरणार्थ बा. कृ. गलगली यांच्या 'लघुकथा कशी लिहावी' या पुस्तकातील बरेचसे विवेचन फडक्यांच्या व्याख्येच्या आधाराने केलेले दिसून येते.

**ना. सी. फडके** - 'कमीत कमी पात्र आणि कमीत कमी प्रसंग वापरून थोड्या वेळात परिणामकारक रितीनं सांगितलेली व ऐकणाराच्या मनावर एकच एक ठसा उमटविणारी हकीगत म्हणजे लघुकथा होय.''

या शिवाय काही इंग्रजी व्याख्यांचे रूपांतर इतर काही लेखकांनी वेगवेगळ्या प्रकारांनी करावयाचा प्रयत्न केलेला दिसतो. मराठी कथा : 'स्वरूप आणि आस्वाद' या ग्रंथात श्री. ह. वि. कुलकर्णी यांनी गाडगीळांची कथालेखनावरील व नवकथेवरील दोन मते खडक आणि पाणी मधून उध्दृत केलेली आहेत. पण व्याख्येच्या संदर्भात ती मते अगदीच स्थूल आहेत. ती मते पुढीलप्रमाणे, ''लघुकथा लेखकाविषयी एवढेच ध्यानात ठेवायचे की, जीवनाच्या ढिगाऱ्यात तो आपला हात खुपसतो आणि मग वाचकांपुढे मूठ उघडून म्हणतो, 'ही पहा जीवनातील मोलाची भावसत्यं -!' व दुसरे अवतरण - ''नवकथा म्हणजे काही जुन्या कथेच्या वर्तुळाशेजारी काढलेले एक छोटेसे वर्तुळ नव्हे, नवकथा हे एक मोठे वर्तुळ आहे. जुन्या कथेचे वर्तुळ हा या मोठ्या वर्तुळाचा लहानसा भाग आहे.'' यातील पहिल्या अवतरणात लघुकथेतील विषयांना नसणारा तोटा व्यक्त केला आहे. दुसऱ्यात तर कथेच्या व्याख्येपेक्षा विकासावरच गाडगीळांचा भर दिसतो. कुलकर्णी यांनी उध्दृत केलेल्या खांडेकरांच्या अवतरणाचाही व्याख्येशी संबंध पोचत नाही. हे स्पष्ट करावयाचे कारण म्हणजे त्यांच्या या व्याख्याविचाराच्या प्रकरणावरून खांडेकर व गाडगीळांनी काही स्वतंत्र व्याख्या केल्या असाव्यात असे वाटते. पण या अवतरणांचा वरच स्पष्ट केल्यानुसार व्याख्येशी संबंध फारच दूरान्वयाने पोचतो.

मराठीत Short Story ला पर्यायी शब्द म्हणून लघुकथा हा शब्द वापरण्यात आला. परंतु हा शब्द व्याख्या

करीत असता दिशाभूल करणारा ठरू शकतो. ''जी कथा केवळ 'लघु' आहे तीच लघुकथा असा गैरसमज या शब्दाने होतो ... तथापि कथेचे लघुत्व हे या वाङ्मय प्रकाराचे एक अंग म्हणता येईल. त्याचा प्रमुख गुण आहे असे म्हणता येणार नाही.''

**व्युत्पत्तिविचार :**

मराठीत लघुकथा वा कथा या शब्दाला पर्यायी शब्द म्हणून प्रामुख्याने 'कहाणी' व 'गोष्ट' हे दोन शब्द वापरले जातात. शिवाय कीर्तनात कथा हा भाग महत्त्वाचा असल्याने रूढीने जरी फारसा वापरात नसला तरी कीर्तन हा कथेचा पर्यायी शब्द म्हणून वापरलेला दिसतो. कथेच्या व कथेच्या पर्यायी शब्दांमागील व्युत्पत्ति दृष्टचा कारणमीमांसा कोणती आहे हे त्या शब्दांतील भेद लक्षात येण्याच्या दृष्टीने उचित ठरते. या शब्दांची व्युत्पत्ति पुढीलप्रमाणे -

**कहाणी** - हा शब्द संस्कृतातील 'कथानिका' या शब्दावरून आलेला असून या शब्दाची व्युत्पत्ति- कहाणी - स्त्री, गोष्ट, अद्भुतरम्य कथा, दुःखदायक वर्णन (लक्षणा) A tale or story सं. कथानक - कथनिका प्राकृत -कहाणिया, हिंदी - कहाणी. सिंधी-किहाणी. संस्कृत शब्द कथिका असा आहे. त्यापासून कहिआ आणि णी हा प्रकृत प्रत्यय अशी व्युत्पत्ति बसते. कथनिका शब्दाचा अर्थ कारुण्य व अद्भुत मिश्रीत पण अंती सुखकर असणारी अशी कथा असा दिलेला दिसतो.

आज मराठीत तरी या शब्दाचा अर्थ संकोच झालेला दिसतो. ''हा शब्द मराठीत धर्मविधीशी संलग्न अशाच कथांना लावला जातो. गुजराथी, हिंदी, बंगाली वगैरे भाषांत 'कहानी' हा शब्द पवित्र त्याप्रमाणे लौकिक कथांनाही सरसकट लावला जातो. मराठीत कहाणी व गोष्ट हा जो फरक आहे, तो या भाषांत आढळत नाही. कहाणी व गोष्ट हा जो फरक लक्षात घेणे आवश्यक ठरते. तसेच या दोन शब्दांतून ध्वनित होणारा अर्थ व कथा-लघुकथा या शब्दांचा अर्थ यातील भेदही पाहणे उचित ठरेल. हा भेद या तीन शब्दातून व्यक्त केलेल्या स्वरूप वैशिष्ट्यांचा विचार करता लक्षात येतो.

**कहाणी** : सैल बांधणीत अनुक्रमाने गुंफलेल्या घटना.

**गोष्ट** : कालक्रमानुसार गुंफलेल्या घटनांचे नीटस बांधणीचे कथानक.

**लघुकथा** : पूर्व नियोजित स्वरूप घडवून आणण्याच्या दृष्टीने आवश्यक तेवढ्याच साधनाद्वारे कालाक्रमानुसार नव्हे तर चढत्या क्रमाने घटनांची गुंफण करून अंती एकच चूक संस्कार करणारी परिणामकारक हकीकत.

**गोष्ट** : व्युत्पत्ती-स्त्री. हकीकत, कथा, कृत्य, वृत्त A Story, A Tale, A Matter, An Aicair (सं. गोष्ठी, गोष्ठी. घुष् + त = घुष्ट >गोष्ट (?) प्राकृत - गोठ्ठ, गोठ्ठी. हिंदी -गोष्ठ >गोष्ठी. पंजाबी -गोह्थ (गोष्ट), गुजराथी - गोठ, फार्शी - गुंफतन्)

**कथा** : या शब्दाची व्युत्पत्ती संस्कृतातील कथ्, या क्रियापदाशी जोडली जाते. 'कथा' जा या शब्दाची म्हणून व्युत्पत्ती न देता. कृ. पां. कुलकर्णी यांनी कथ् या क्रियापदाच्याच व्युत्पत्तीत हा विचात केलेला दिसतो. व्युत्पत्ती - कथ (णे) - सकर्मक क्रियापद - सांगणे To, Tell, To Narrate (संस्कृत - कथ-वाङ्यप्रबन्धे. प्राकृत कह >कथ>कत्थ>कहिज्ज. हिंदी - कहना, गुजराती - कहनु , सिंधी - कहनु, मराठी - कथणे. प्राकृत धातूपासून हिंदी, गुजराथी, सिंधी वगैरे भाषातील धातु सिद्ध होतात. मराठी शब्द - कहाणी (सं. कथनिका) पासून सिद्ध होतो. मराठीतील पुढील शब्द तत्सम आहेत. कथा (गोष्ट ,

(कृपया पान क्र. ३२वर पहा)

# भारतीय संस्कृति - बीज, मॉडेल व साधने

*वैश्विक रचना, विश्वसंकल्पना यांच्या दृष्टीने भारतीय संस्कृतीचा विचार मांडणारा हा पाचवा लेख. विषयाची संगती लागण्याच्या दृष्टीने वाचकांनी हे सर्व लेख एकत्रित ठेवावेत ही विनंती - संपादक*

**(भाग ५)**

भारतीय संस्कृतीच्या बीजाचा शोध घेण्याचा उपक्रम, थोड्याश्या विस्कळित व ढोबळ पद्धतिने, आपण 'दिशा' या मासिकाच्या गेल्या काही अंकांमध्ये केला.

### ईश्वरनिर्मित संस्कृती

ह्या प्रयत्नात एक मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे की बीज 'ईश्वरनिर्मित' आहे. ईश्वर शब्दाला हरकत असेल तर, ह्या उलट पृथ्वीवरच्या भौतिक जीवनाचा संदर्भातच केवळ ह्या संस्कृतीचा उगम झाला व पुढे त्याचा विस्तार स्वतंत्र 'Social Intercourse' म्हणजे सामाजिक जीवनाच्या स्वतंत्र आणि एकाकी व्यापारातुन झाला, असे दिसत नाही. तुलनेने भारतीय संस्कृतीचे हेच वैशिष्ट्य, ह्या पृथ्वीवरील इतिहासातील लोप पावलेल्या किंवा सध्या जीवंत असलेल्या कुठल्याही संस्कृत्यांना लागू पडणार नाही. रोमन, ग्रीक, इजिप्शियन किंवा सध्याच्या युरोपियन वगैरे संस्कृत्या ह्या त्याच्या मुळाशी भारतीय संस्कृतीचा हा उल्लेखनीय विशेष दर्शवित नाहीत.

### भारतीय संस्कृतीचा विशेष :

कोणता हा विशेष आहे ?

ह्या प्रश्नाच्या उत्तरासाठी महायोगी अरविंद घोष ह्यांचा एक उत्कृष्ट दाखला, - भौतिक दृष्टि असलेल्या मानवी मनाच्या 'अपूर्ण क्षमतेबद्दल' व सामान्य प्रवृत्तिबद्दल, भाष्यात्मक आहे, तो बघू या (चित्र पहा)




**Cosmic Lotus**

" The Significance of the lotus is not to be found by analysing the Secrets of the mud from which it grows here. Its Secret is to be found in the heavenly archtype lotus that blooms for ever in the light above. (Sri. Aurobindo, 'letters on Yaga', p. 1609)

मुक्त भाषांतर-

''कमळाचे महत्त्व (व सौंदर्याचा) शोध ज्या

चिखलात ते उगवते त्या चिखलाच्या रहस्यात किंवा पृथक्करणांत सापडत नाही. त्या (कमळाचे) रहस्य 'आकाशातल्या' (अव्यक्तातल्या जगात) कमळाच्या 'संकल्पनेत' व 'प्रकाशात' सापडेल, जिथे ते अनंत काळपर्यंत उमलत राहिले आहे.''

कुठल्याही वृक्षाच्या पानांचे, फांद्यांचे, खोडाचे, फुलांचे, फळांचे आकार, रंग, रुप, चवी, विस्तार, आयुष्य व जीवन व्यवहार हा त्यांचा जमीनीखालील बीजामध्ये सूत्ररुपाने असतो. त्याच्या जमीनीवरील अविष्कार लोभस व दृश्य असला तरी त्यांचे गुणधर्माचे सूत्र हे त्या वृक्षाच्या बीजांत असते. त्याचा जमीनीवरचा अविष्कार हे बीजरहस्य विशद करु शकत नाही. भौतिक ज्ञानाची मजल ह्या सूक्ष्मांत जाऊ शकत नाही. त्याला निराळी दृष्टी, जाणीव व ज्ञानमार्ग धुंडाळावे लागतात.

**'अश्वत्थ' श्रुती ज्ञान गीतेतून -**

हेच ज्ञान - जे अरविंदांनी एका अलंकारिक दृष्टांतातून दिले तेच सूत्ररुपाने व 'श्रुती ज्ञान' पद्धतिने महर्षि व्यासांनी कृष्णाच्या तोंडून अर्जुनासाठी 'पुरुषोत्तम योगात' १५व्या अध्यायांत 'भगवद्गीतेत' सांगितले आहे.

श्री भगवान उवाच -

उर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ।
छंदासि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥१॥

''मूळ (एक) वर, व शाखा (अनेक) खाली असून (जो) अव्यय म्हणजे कधीही नाश न पावणारा, छंदासि म्हणजे वेद ही ज्यांची पाने, असे ज्या अश्वत्थवृक्षाचें वर्णन करितात, तो (वृक्ष) ज्याने जाणिला तो पुरुष (खरा) वेदवेत्ता होय.'' - भाषांतर-लोकमान्य टिळक

मतितार्थ हा कीं भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य जर तिच्या बीज स्वरूपांत जाणावयाचे असेल तर 'वेदतोत्ता' - ब्रह्मज्ञानी याने गीतेत सांगितलेल्या 'युक्तीने' ह्या पृथ्वीवर झालेल्या जीवन विस्ताराचे गुह्य इथेच न शोधतां त्या अव्यक्त जगांत शोधावयाला हवे. हे सामर्थ्य प्राप्त करण्यासाठी मानवीदेहाला सर्वसाधारणपणे दिलेली ज्ञानेंद्रिये उपयोगी पडणार नाहीत, तर ह्या 'सत्य' व 'ऋत' ज्ञानाची प्राप्ति साक्षारत्कारी मार्गाने किंवा योगाच्या भाषेत 'समाधिजन्य ज्ञानमार्गाने' मिळवावी लागेल. ही शक्ति जर मिळवून आली नाही, तर ज्या ऋषी मुनींनी तपस्या करून हे अपौरुषेय ज्ञान मिळवले त्याच्या ज्ञानावर 'आत्मज्ञान' ह्या विश्वासाने प्राप्त करावे लागेल. मानवी जीवाला ह्या पृथ्वीवर फक्त १०० वर्षे आयुष्य आहे. त्या काळांत हे सत्य व युक्ती ही संस्कृती अनेकविध मार्गाने संक्रमित करत आली आहे. हे मानवी प्रज्ञेचे विलक्षण कोडे व त्याचे उत्तर फक्त भारतीय संस्कृतीमध्ये जतन व वृद्धिंगत केले आहे.

**कला व संस्कृतीतील परतत्त्व -**

ह्या विलक्षण मार्गाने प्रगत झालेल्या नाना तऱ्हेच्या विद्या व कला आपल्या वैशिष्ट्यामुळे भारतीय संस्कृतीच्या विकासात प्राप्त झालेल्या दिसतील व त्यांचा विकासही भविष्यांत करता येईल. ह्या मानवी जीवनाच्या अस्तित्वाबद्दल व अंतिम उद्दिष्टाबद्दल स्पष्ट व 'बिलकूल भ्रम नसलेली जाणीव' ह्या संस्कृतीतच प्राप्त होऊ शकेल. स्वतःचे इंद्रिय व ज्ञानभ्रम ओळखण्याचा उपदेश व मार्ग ह्या संस्कृतीने गेले युगेनयुगे संभाळला आहे व पुढच्या जीवांना संक्रमित केला आहे.

भारतीय संस्कृतीचा 'भावनात्मक किंवा संसार विशेषात्मक' असा अभ्यास 'साने गुरुजींनी' केलेला दिसेल. (पुस्तक 'भारतीय संस्कृती') पण, त्या जीवनमार्गाच्या (form) रुपामध्ये जी जीवनमूल्ये जोपासली असलेली गुरुजींना भावली, त्यांची शास्त्रीय किंवा तत्त्वज्ञानात्मक बांधणी इथे सापडणार नाही.

**लोकायत -**

'लोकायत' ह्या कॉम्रेड देवीप्रसाद चट्टोपाध्याय ह्यांच्या गाजलेल्या पुस्तकांत किंवा स. रा. गाडगीळ ह्यांच्याही पुस्तकांत भारतीय संस्कृतीचा जो शोध घेण्यात आला आहे तो एका ठाम पूर्वग्रहावर आधारलेल्या एकांगी व स्वतंत्र (Exclusive) 'भौतिकवादी' भूमिकेतून मांडण्यात आला आहे. त्यात 'संस्कृतीचे बीज' सापडणार नाही. भौतिकवादाला अनुकूल अशा गोष्टींची त्यांना अनुकूल अशी वेचक, निवडक पक्षपाती मांडणी आढळेल. ही अभ्यासाची पद्धत पूर्णपणे दोषयुक्त आहे. कारण, त्यांत 'भौतिकवादी पॅरॉडिम'च्या गुलामीचा व वकीलीचा दोष आढळेल. ज्ञानाच्या भूमिकेत भौतिक सायन्सला अमान्य असलेल्या 'साक्षात्कारी' व 'समाधिजन्य' ज्ञानाचा अव्हेर सापडेल. हा अप्रामाणिकपणा आहे व संकुचित, अशास्त्रीय व पक्षपाती दृष्टिकोन आहे.

पण, मला असे आढळले की अत्यंत प्रामाणिकपणे मानवी संस्कृतीचा शोध घेणाऱ्या मोठमोठ्या समाजशास्त्रज्ञांनीही हीच भयंकर मोठी चूक केलेली आहे.

ह्या पृथ्वीवर 'जगलेल्या' इतरही संस्कृत्यांमधे सुद्धा (civilizations) ह्या 'आध्यात्मिक' किंवा 'Spiritual' -dimensions काही प्रमाणात होत्या व सापडतील. पण, त्यांचा पत्ता ह्या विचारवंताना लागत नाही तर हेतुपुरस्सर ते त्याला 'Mysticism' 'चमत्कारवाद' किंवा 'गूढवाद' ह्या श्रेणीमध्ये ढकलून सत्याला कुंपण घालताना दिसतात.

**पिट्रीम सोरोकिन -**

तुलनेसाठी -असा एक ताजा अभ्यास - 'पिट्रीम सोरोकिन' ह्यांचा आढळला. सोरोकिन हे रशियन विचारवंत आपल्या स्वतंत्र राजकीय विचाराच्या 'गुन्ह्यामुळे' रशिया सोडून अमेरिकेत स्थायिक झाले. हार्वड युनिव्हर्सिटीमध्ये सोशॉलॉजीच्या शाखेत त्यांना त्यांच्या अभ्यासामुळे आंतरराष्ट्रीय कीर्ति प्राप्त झाली.

**तीनमितीचे सत्यज्ञान**

सोरोकिन यांना त्यांनी प्रसृत केलेल्या 'Theory of Intergralism' 'एकात्मवादाचे सामाजिक शास्त्र' ह्या विचारधारेचे श्रेय देतात. He wrote - "The reality given by the integral 'three-dimensional truth' with its sources of intuition, reason and the senses, is nearer approach to the infinite metalogical reality of the 'coincidentia oppositorum' than the purely sensory or purely rational or purely intuitional reality, given by the systems of truth and reality."

Sorokon's integral theory incorporates elements of <u>Eastern mysticism,</u> but its breadth allows it to be <u>compatible with western religious thought</u> as well. Sorokin's theory continues to evolve. Modern integralism, views society, and often the entire planet, as an organic inter-related whole Rather than reject different belief systems, integralists combine the best from each to create Synergistic insight"

सोरोकिनच्या सामाजिक विचारांचा मागोवा हा उदाहरणादाखल आपण घेणार आहोत. इतर निखळ भौतिकवादी व आर्थिकवादी (Marxist) विचारापेक्षा हा थोडासा कां होईना पण ज्ञानाच्या, काही भौतिक चाकोरीबाहेर, विचार करताना आढळेल.

**प्रतिभा साक्षात्कार अंतर्ज्ञान-**

त्यांच्या विचारणपद्धतीत 'इंट्यूशन', रीझन (बुद्धीवाद) व इंद्रियगोचर ज्ञान ह्यांचा मिळून सत्याचा शोध घेतला जावा ही धारणा आहे. सामाजिक बदल, कलेचा अविष्कार, कायदा, नैतिकता वगैरेवर संस्कृतीच्या स्वरूपाचा प्रभाव पडतो हे त्याला मान्य आहे. समाजातले थर व त्यांतील स्थित्यंतरे ही सुद्धा ह्या संस्कृतीच्या विशिष्ट स्वरूपावर आधारून होतात, असा त्याचा विश्वास आहे.

त्याकरिता त्याचा आधार कोणता ? तर त्याच्या टीकाकारांच्या शब्दात "Enormous statistical labor"

establishing trends in the fluctuation of art forms, of philosophical ethical and legal norms and values or of social relationships-which had been examined by experts"

त्यांच्या मते समाजातले बदल एका अव्याहत ‘ऱ्हीदम्’ (Rythm) वर होतात आणि ते कुठल्यातरी, ईश्वराच्या इच्छेने, स्वैर इच्छेने होत नाहीत. हा ताल तीन प्रकारच्या सांस्कृतिक प्रकाराच्या क्रमाने होणाऱ्या बदलामुळे होतो. ते प्रकार म्हणजे -

1) Sensate Culture - इंद्रिय (भोग)वादी संस्कृती.

2) Ideational Culture - आणि कल्पनारम्य संस्कृती.

3) Idealistic Culture - आदर्शवादी संस्कृती.

थोडक्यात म्हणजे अजूनही ‘ईश्वर तत्त्व नाकारण्याचा आग्रह सुटत नाही. मग 'Intution' म्हणजे काय ? आणि हे 'Rythm life cylces' कां होतात व कोणाच्या आदेशाने होतात. का होतात हे प्रश्न अनुत्तरित रहातात.

हे सर्व आक्षेप जरी खरे असले व भारतीय संस्कृतीचे बीज, स्वरुप जाणण्याचा प्रयत्नांत उणीवात्मक असले तरी, सोरोकिन काही गोष्टी मान्य करतात. ह्या गोष्टी कोणत्या, हे बघणे प्रस्तुत ठरेल. कारण, पाश्चात्य भौतिकवादाच्या भूमिकेतून संस्कृति ह्या विषयाकडे कसे बघितले जाते ह्याचा आपल्याला पत्ता लागेल.

सोरोकिनच्या मताने कुठल्याही मानवी संस्कृतीच्या स्वरूपांत व व्यापारात तीन शक्ति किंवा प्रेरणा महत्त्वाच्या आहेत.

१) मनुष्य हा मुख्य खेळगडी - संस्कृतीचा भागीदार, भोगी व भक्ष.

२) जीवनमूल्ये, नैतिकता, अर्थ (जीवनाचा, चैतन्याचा)

३) साधने, उपचार, आचार ज्यामुळे ह्या जीवनमूल्यांना, नैतिकतेला प्रत्यक्ष स्वरूप प्राप्त होते.

**स्ट्रक्चरल ॲनालिसिस -**

सोरोकिनने समाजावर विशिष्ट संस्कृतीचा जो परिणाम होतो तो समाजांतील थर (Structures) समाजातील, थरांतील बदल (Mobility) ह्यांचा विशेष अभ्यास मांडला आहे. ही निरीक्षणशक्ती कौतुकास्पद असली तरी कारण मीमांसा ही बहुतांशी पूर्वग्रही भौतिकवादीच आहे.

पण, ह्या सर्व अभ्यासाचा आधार व शास्त्र हे ह्या बदलांचे दृश्य वा बाह्य स्वरुप व त्यांचा ‘स्टॅटिस्टिकल ॲनॉलिसिस’ हाच आहे. त्यामुळे जेव्हा ह्या बदलांचा किंवा प्रेरणांच्या मुळाशी जाण्याचा प्रश्न येतो, तेव्हा या अभ्यासाला सीमा पडतात व तश्या त्या पडलेल्या आहेत.

सगळ्या भौतिकवादी, निरीश्वरवादी, अनाध्यात्मिक (Non-Spiritual) अभ्यासकाची हीच गत आहे, त्याला सोरोकिनही अपवाद नाहीत. मग आध्यात्मिक अभ्यासक काय म्हणतात हे तुलनेने पहाणे फायद्याचे ठरेल-प्रस्तुत ठरेल - नाही कां ?

**ज्ञानमार्ग हा श्रद्धेचा प्रश्न**

ह्या प्रस्तावाला मुख्य प्रचलित अडथळा खाडकन उभा रहातो, तो म्हणजे वसिष्ठ, वाल्मिकी, विवेकानंद, महायोगी अरविंद वगैरे आध्यात्मिकविभूतिंच्या ‘विश्वासार्हतेचा’ !! कारण स्टॅटिस्टिकल पृथक्करण-प्रत्यक्ष भौतिक सामाजिक स्वरूप व बदल यांच्या सत्यतेच्या तुलनेने ‘समाधीजन्य’, ‘साक्षात्कारी’ ज्ञान कुठे पासंगाला टिकणार नाही कां? असा समज सगळ्या भौतिकवादी वैज्ञानिक विचारवंतांचा आहे !!!

इथे, सध्याच्या समाजाच्या वैचारिक श्रद्धांचा प्रश्न

उभा रहातो. त्या समाजाला एका भौतिकवादी शिक्षणपद्धतीने एका 'पॅरेडिमच्या' खांबाला बांधून टाकले आहे. डोळे बांधलेल्या बैलांसारखे त्यांचे 'ज्ञानाचे शोध', एका तेलाच्या घाण्यासारखे वर्तुळाकार आहेत. ह्या वर्तुळाच्या बाहेर 'सत्यदर्शन' आहे हे त्यांना माहित नाही- पटणार नाही, इतके हे डोळ्यावरचे झांपड पक्के आहे !!

"Epistemological Approaches" 'ज्ञानशास्त्राच्या मार्गाचा' हा प्रश्न आहे. इथे 'Vedic Epistemology' वैदिक ज्ञानमार्ग, व पद्धती व तंत्र ही आवश्यक आहेत. इथे इंद्रियातीत, अवस्थात्रयातीत, कालत्रयातीत दिव्यचक्षूंची आवश्यकता आहे. कारण हे दृश्य जग हे नाशिवंत व अपूर्ण सत्य (अर्धसत्य) आहे व मानवी बुद्धी, इंद्रिय, मन, अंतःकरण, शरीर यांच्या क्षमतेपलीकडील ह्या सत्याचा स्त्रोत आहे.

पृथ्वीवरील समाजशास्त्रज्ञांना, विचारवंताना, संस्कृती व समाज ह्यांच्या वैशिष्टयांचा, उगमांचा, मूल्यांचा, प्रेरणेच्या अनंतत्वाच्या स्त्रोताचा अविष्काराचा शोध घ्यावयाचा आहे, पण त्यांची दृष्टी ही 'ब्लॅक होलच्या' पलीकडे पोहोचूं शकत नाही. प्रश्न त्यांच्या श्रमाचा, प्रामाणिकपणाचा नसून 'क्षमतेचा' आहे. ज्ञानपद्धतीचा आहे, साधनांचा आहे, विश्वासाचा आहे, पूर्वग्रहांचा आहे, भ्रमाचा आहे.

एक तर ह्या अभ्यासाकरिता त्यांचे "Matrix" (जाळे) फारच तोकडे, संकुचित व अपूरे आहे.

सोरोकिन ह्याने ज्या तीन प्रेरकशक्ती गृहीत धरल्या त्यांच्या पलीकडे व सूक्ष्मात, अंतरंगात व 'अव्यक्त जगाच्या' प्रातांत (unmanifost world) , विश्वनिर्मितीच्या मूळ क्रियेत, इच्छेत, योगक्रियेत (निर्मिती यज्ञ) जाणे आवश्यक ठरेल. इथे अध्यात्मशास्त्र योग, स्पिरीच्यूॲलिटी, वैदिक ज्ञानपद्धतीचा अभ्यास आवश्यक आहे. हे केवळ चैतन्यरहित, नैतिकतारहित, सरळ रेषेतील बुद्धीचे, अशा वृत्ती व षडरिपू ह्यांच्या प्रभावाखाली बुद्धीचे, मनाचे, अंतःकरणाचे क्षेत्र नव्हे. ह्या सर्व महत्त्वाच्या गोष्टी, निष्कर्ष, विचार पद्धतीतील दोष, धोके, खड्डे यांची स्मृती भारतीय संस्कृतीने स्मृतींत जोपासली आहे. ती तिच्या तत्त्वज्ञानात, मॉयथॉलॉजीत, (पुराणांत) (Ritnuls, Scriptures) स्पिरिच्यूअलस्, स्क्रिपचर, संहितेत, वाङ्मयात, कलेत, शिल्पांत, संगीतात, आयुर्वेदात, तंत्रांत, योगात, यंत्रात व भाषेत (संस्कृत) मध्ये सांभाळली आहे.

थोडक्यात म्हणजे समाजांत 'दृश्य परिणाम दिसतात' त्यांच्या केवळ आधारावर - खोलवर न जाता - 'स्टॅटिस्टिकल' जे निष्कर्ष निघतात त्यांना सत्य मानणाऱ्याच्या विश्वासावर संस्कृतीचा अभ्यास करणे हा त्यांचा मार्ग !! अंतर्ज्ञान (म्हणजे इंट्यूशन) ह्याचा शास्त्रीय विचार न करतां त्या अंतर्ज्ञानाच्या मानवी अंतःकरण, बुद्धी, मन, वृत्ति ह्यांचा अभ्यास न करता काढलेले निष्कर्ष !! ह्या सर्व पद्धतीला तोकडी, अपूर्ण व अज्ञानी कां म्हणू नये!

मग भारतीय संस्कृतीच्या अविष्कारांत निर्माण झालेले साहित्य, कला व जीवनव्यापार, मूल्ये ह्यांचा शोध जर संस्कृतीच्या मूळबीजाच्या संशोधनापर्यंत जास्त उच्च, खोल, सूक्ष्म ज्ञानपद्धतीचा विचार प्रस्तुत व आवश्यक ठरेलच नाही कां !

**भारतीय तत्त्वज्ञान, साधना ही बैठक**

ह्या विषयांत अव्दैत तत्त्वज्ञान, योगीक तत्त्वज्ञान, आध्यात्मिक तत्त्वज्ञान व मार्ग ह्यामध्ये अफाट संशोधन झालले आज भारतात उपलब्ध आहे. त्याचा अंतर्भाव शिक्षणपद्धतीत नाही, राजकीय व सामाजिक विश्वासात नाही. उलट ह्या 'बहीष्कृत विषय' ठरवला आहे. असा सर्व प्रयत्न 'Saffronisation' ह्या राजकीय आरोपाने, हेतूने उधळला जाईल. पण, त्याचे नमून्यादाखल थोडे दाखले

किंवा पद्धती पाहिली की ह्या आरोपातील तथ्य दिसेलच, अशी मला खात्री आहे.

प्रथम, थोडेसे अव्दैत ज्ञानपद्धतीतील ठोकताळे निष्कर्ष सांगतो -

"Advaita epistemology is not easy to expound. How the one non-dual consciousness that is the self appears split into cognizer, cognition and object cognized, it is not possible to explain. To say that this apparent splitting is the work of 'maya' is to say that it is inexplicable.

The empirical situation in knowledge which demands, the distinction of three factors (त्रिपुटी) cognizer, cognition and object cognized, does not offer a satisfactory explanation. While the systems of philosophy that are opposed to 'Advaita' imagine that they have offered an explanation, Advaita shows that the problem is inexplicable on the level of 'relative experience' when, this level is transcended in the plenary non-dual experience, there is no longer any problem to be solved."

आपले सध्याचे ज्ञान हे अव्दैततत्त्वावर आधारलेले - तुलनात्मक नात्यांवरील तुलनेवरल्या आधाराचे आहे. शिवाय, ह्या ज्ञानाची प्राप्ती होणारा माणूस त्याच्या स्वतःच्या अस्तित्वांचा सत्यतेबद्दल (Objective) अनभिज्ञ आहे. तो स्वतःला नाशिवंत समजतो. त्यामुळे 'आत्मज्ञान' न झाल्यास ह्या ज्ञानाला कांही अर्थ रहाणार नाही. Cognizer कोण आहे व त्याच्या वैश्विक अस्तित्वाचा खरा अर्थ काय, हे त्याला माहित नाही. 'ससा हा कापूस पिंजून ठेवला तसा दिसतो' ह्यात कापसाचे ज्ञान आवश्यक आहे. हे स्वतंत्र ज्ञान नव्हे. 'रिलेशन' आहे.

साखरेची चव आजारी माणसाला कडू वाटते, कारण हे इंद्रियजन्य ज्ञान-दोषमुक्त आहे. पित्तामुळे हा दोष त्या ज्ञानाला लागू आहे. ह्याचा अर्थ ज्ञानाची साधने दोषमुक्त हवीत, भ्रमात्मक नव्हेत. ज्ञानाचा स्वीकार करणारा सुध्दा दोषाने भरलेला आहे.

प्रमाता, प्रमेय व प्रमाण यापैकी कोणतेही एके ठिकाणी दोष असला तरी 'अध्यास' होऊ शकतो. अध्यास म्हणजे भ्रमयुक्त ज्ञानाचा सत्यज्ञानावर आरोप.

शिवाय 'अविद्या' ही ज्ञानाच्या भ्रमाची आणखी एक अवस्था आहे. 'अविद्या' म्हणजे विद्येचा अभाव नव्हे, तर चुकीच्या ज्ञानाला किंवा 'भ्रमयुक्त' ज्ञानाला 'अविद्या' म्हणावे लागते. 'शरीर म्हणजे मी', हे अविद्येचे ज्ञान होय. नाशिवंत वस्तूंना सत्य व ऋत संबोधणे Eternal Knowelge' समजणे हे अविद्येचे लक्षण आहे.

In sense perception there is the intervention of a Sense-organ between subject and object. त्यामुळे ह्या माध्यमाच्या दोषांची लागण, ही ज्ञानाला होते.

**वैश्विक ऑबजेक्टिव्हिटी**

थोडेसे मध्यंतर म्हणून पुन्हा एकदा 'भारतीय संस्कृतीच्या बीजाचे, मॉडेलचे व साधनांचे शोध घेतांना - ह्या दोन भिन्न ज्ञानमार्गांच्या चर्चेत आपण कां शिरलो ते बघु या. प्रथमच एक गोष्ट ध्यानात ठेवायला हवी कीं भारतीय संस्कृतीचा गाभा हा स्पिरीच्यीअल ज्ञानावर आधारलेला आहे व 'भौतिक जग' हा ह्या स्पिरीच्यूअल जगाचा एक साधनेला उपयुक्त, जीवांच्या काँशनसेमध्ये मूलाग्रही बदल करण्याचा प्लॅटफॉर्म व लॅबोरेटरी आहे, हा आहे. त्यामुळे 'अतींद्रिय दृष्टीशिवाय' हे ज्ञान प्राप्त होणे अशक्य आहे. ज्ञानाची जी भौतिक पातळी आज सर्वसाधारणपणे पाळली जाते, त्याच्या तर्कपद्धतीने वा अनुभवाने भारतीय व पाश्चात्य संस्कृत्यांतील फरक समजणे दुरापास्त आहे. तसे प्रयत्न हे फसवी तुलनाच करतात.

पुन्हा एकदा पिट्रीम सोरोकिन ह्यांच्या अभ्यासाकडे वळू. त्यांचा प्रश्न आहे.

"Mathematics and Logic are mainly the system of truth of human reason; and the natural sciences are mainly the depository of the 'truth of senses'.

More questionable nowadays is the 'truth of faith' derived from such a source, which is called by diverse names as : "Intuition", "inspiration", "revelation", "extrasensory perception", mystic experience" and so on. Does such a Source, as distinct from discursive dialectics, or testimony of the organs of senses exit?"

त्यामुळे एक स्पष्ट झाले की संस्कृतीच्या अभ्यासाला ‘इंट्यूशन’ (Intution) ही चीजच बीजात्मक आहे, मूळ आधार आहे हे मान्य झाले आहे. मग आतां ‘इंट्यूशन’ व त्याला समांतर अर्थी ज्या क्रिया संस्कृतीच्या उभारणीला कारणीभूत आहेत ती ‘इंट्यूशन’ चीज काय आहे, असा प्रश्न त्यांना पडला आहे.

सोरोकिन ह्यांनी त्यांच्या 'The Crisis of our Age' ह्या पुस्तकांत त्या ‘चीजेचा’ शोध त्यांच्या पद्धतीने व अंगाने घेतला आहे. तो विस्तृत आहे पण ह्या ‘चीजेच्या’ रहस्याचा भेद करु शकलेला नाही. न्यूटन, फ्रॉन्सिस बेकन ते G. Birkhoff, H. Dingle, H.O. Taylor ह्या सारख्या शास्त्रज्ञ, गणिती वगैरेंच्या विचारांचा तलास घेतला. तसेच-

- फ्रेडरिक नित्शे, प्लॅटो, जे एस् मिल, सर ऑर्थर एडिंग्टन, सी. जी. जंग, स्पिनोझा, बर्गसन, क्रोस, व्हाईटहेड आणि अनेकांच्या विचारांचा तलास घेतला, पण हे रहस्य उलगडत नाही. निष्कर्ष काय निघाले ते थोडक्यात पहा. एक म्हणजे व्याख्या तयार झाली !

### इंट्यूशनची व्याख्या

K. W. Wild यांनी हा सगळा प्रयत्न बघून त्याचा गोषवारा असा मांडला.

" An intution is an immediate awareness by a subject of some particular entity, without such as from senses or from reason as would account for that awareness. There is undoubtedly an intuitive method and immediate intuitive awareness on which reason and all other forms of knowing are dependent. Intution is not alternative to reason (or to senses, P.S.); its minimum function is to form a basis for reason, and its wider functions (if any) to deal with what is inaccessible to reason...

The intution gives us insight into reality as opposed to, or supplementing appearance... That (special forms of ) intution is an endowment of specially gifted people" [K.W. Wild, 'Intution-Cambridge University Press 1938 pp.226]

सोरोकिन हे मान्य करतात की इंद्रियगोचर ज्ञान आणि बुद्धिगम्य ज्ञानापेक्षा अंतर्ज्ञान (Intution) हा ज्ञानाचा खरा झरा आहे. सत्य ज्ञानाचा स्त्रोत आहे. त्यामुळे श्रद्धेवर आधारलेले सत्यदर्शन जे अंतर्ज्ञानावर मिळते तेही विश्वासार्हच मानावयाला हवे. त्यामुळेच कदाचित धर्म, कला, संगीत हे चिरकाल टिकून आहे. व ते संस्कृतीचा गाभा बनून रहाते. सोरोकिनच्या अभ्यासाचा सारांश असा कीं, त्यांच्या संस्कृतीचा अभ्यासात त्यांना 'Theory of Knowledge' ‘ज्ञानाचे रहस्य’ ह्या विषयांत जावे लागले. त्यांनी स्वतःपुरते कांही निष्कर्ष काढले, त्यांत अंतर्ज्ञान पद्धतीला श्रेष्ठ मानून इतर ज्ञानाच्या पद्धतींचा एकत्र Integral विचार स्तुत्य मानला.

### भारतीय संस्कृतीतील उत्तर -

प्रश्न अजुनही न सुटलेला व महत्त्वाचा, हा की अंतर्ज्ञान म्हणजे काय व त्याचे काही शास्त्र आहे की नाही?

ह्या प्रश्नांची संयुक्तिक व समाधानपूर्वक उत्तरे फक्त भारतीय संस्कृतीतच मिळतात. इथे अंतर्ज्ञानाच्या प्राप्तीसाठी योगशास्त्र, तंत्र, मंत्र, यंत्र, धर्म, आचार-विचार, रिच्यूअलस्, साधना, शिक्षणक्रम, संस्कार, संस्काराची

शास्त्रे व समारंभ हे ह्या संस्कृतीने निर्माण केलेले आहे, वृद्धिंगत केले आहे, जतन केले आहे

इस्लामी, मुसलमानी, तुर्की, अफगाणी, ब्रिटीश, फ्रेंच, स्पॅनिश, सिद्दी (आफ्रिकन) ह्या परकीय संस्कृत्यांनी इथल्या भूमीवर आक्रमण करून मूळ भारतीय वेदिक संस्कृती उध्वस्त केली आहे. इथली शिक्षणपद्धती त्यांच्या आक्रमक, हिंसक, पशूवत, वैश्यवृत्ती व भोगवादी संस्कृतीवर आधारून रचली व लादली, इथले संस्कृतीचे आधार नष्ट केले, वास्तू, मंदिरे, युनिव्हर्सिटीज नेस्तनाबूत केल्या व स्वतःचे फॉर्मस रूढ केले. हा प्रत्यक्ष इतिहास आहे.

त्यामुळे ह्या भारतीय संस्कृतीचा पुनर्शोध, पुनःर्स्थापना करण्याची वेळ ह्या देशावर येऊन ठेपली आहे!!

**पुढचा प्रवास**

डॉ. राधाकृष्णन म्हणतात - वैदिक काळातील संस्कृतीची मूळ रूपे जशीच्या तशी आज आपण स्थापू इच्छित नाही, कारण - "that would be to deny the dialectic of History". Again, we cannot start de-novo, as if India has no history and as if people could change their nature merely by taking thought. Possibilities must be grounded in the nature of the actual. Civilization must live on the lines of their own experience culture is tradition and tradition is memory".

इथे थांबून चालणार नाही. या पुढील विचार पुढच्या लेखांत बघु या.

(क्रमशः)

**यशवंत साने**
(स्पिरीच्युअल सायन्स सेंटर)
सोनल अपार्टमेंट, अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी : २५३६ ८४५०
ई-मेल : yrsane@eth.net

**कथेची कथा - लेखांक १**

(पान क्र. २४ वरून)

कीर्तन), कथानक (गोष्ट) कथनीय (सांगण्यसारखे).

यावरून संस्कृतातील कथ् या धातूपासून कथा हा शब्द मराठीत आल्याचे दिसते. शब्दाचा मूळ अर्थ 'सांगणे' असा असल्याने कथेच्या मूळ स्वरूपातच सांगितल्या जाण्याचा (कथनीयता) विशेष दिसते. 'हा प्रकटनधर्म (कथनीयता) लघुकथेचा एक अंगभूत विशेष आहे.''

**कीर्तनः** रूढीने फारसा वापरात नसलेला पण पर्यायी म्हणून वापरला जाणारा हा एक आणखी शब्द. हा शब्द पर्यायी म्हणून का वापरण्यात यावा हे सांगणे कठीण आहे. व्युत्पत्तिदृष्ट्या या शब्दाचे विश्लेषण (कीर्तणे) सकर्मक क्रियापद स्तुती करणे, वर्णन करणे, गुण गाणे To celebrate the praise, To laud, (संस्कृत - कीर्तयति, किस्ता) असे देऊन पुढे या शब्दाचा अर्थ ईश्वरभजन - नामोच्चार Reciting the names of Daity (याला मर्यादित अर्थ आला आहे.) असा दिलेला दिसतो. म्हणजेच कृ. पां. कुलकर्णी यांनी हा अर्थ कसा व का प्राप्त झाला याचे स्पष्टीकरण केलेले दिसत नाही.

भारतीय संस्कृतिकोशात 'भगवंताचे चरित्र कथन व गुणगान (कीर्तन हा नवविध भक्तीपैकी दुसरा प्रकार आहे.) हे जरी कीर्तनाचे मुख्य अंग असले, तरी तदनुरोधाने जगाला सन्मार्गाचा उपदेश करणे हा कीर्तनाचा एक हेतू असतो. तो साधण्यासाठी कीर्तनात देवांच्या व भक्तांच्या कथा सांगून भिन्न भिन्न क्षेत्रातले उच्च आदर्श समाजापुढे ठेवण्याची प्रथा कीर्तन संस्थेने अंगीकारलेली आहे. असा जो उल्लेख येतो त्यावरून कीर्तनात कथानक येण्याचे कारण स्पष्ट होते.

(क्रमशः)

- प्रा. मोहन पाठक

पुस्तक परिचय

# ग्रंथ, ग्रंथालय, ग्रंथसंस्कृती

*ग्रंथ, ग्रंथालये व ग्रंथसंस्कृती याबाबत सर्वसामान्यांना विचार प्रवृत्त करेल अशा लेख संग्रहाचा हा परिचय.*
*-संपादक*

काळाच्या ओघात मराठी भाषा आणि एकूणच मराठी जीवन इतके इंग्रजाळून गेले आहे की या मराठी जीवनाला समृद्ध करीत आलेला ग्रंथांसारखा, ग्रंथालयांसारखा व एकूणच ग्रंथव्यवहार, ग्रंथसंस्कृती सारखा विषय हा स्वतंत्र अभ्यासाचा, चिंतनाचा व पर्यायाने लेखनाचा विषय होऊ शकतो हे ग्रंथालय आणि ग्रंथालयकक्षेबाहेरील लोकांना जावणत नाही. ग्रंथांची समाजावर, सामाजिक बदलांवर असणारी सत्ता, त्यांचा एकूण मानवी इतिहासावरील परिणाम यांचाही जाणीवपूर्वक विचार केला जात नाही. किंबहुना या विषयाची उपेक्षाच करणे अंगवळणी पडलेले असते.




या पार्श्वभूमीवर ''ग्रंथ, ग्रंथालय, ग्रंथसंस्कृती' हे डॉ. प्रदीप कर्णिक यांचे पुस्तक अतिशय महत्त्वाचे ठरावे असे आहे. स्वतः साक्षेपी ग्रंथपाल व अभ्यासू वाचक असल्याने त्यांच्या चिंतनाला व निरीक्षणाला अनुभवाची जोड आहे. आपल्या जीवनामध्ये ग्रंथ आणि ग्रंथालयांकडे पाहण्याचा सामान्यतः आढळणाऱ्या दृष्टिकोणाचा अभाव व अभावाच्या प्रभावात वाढणारे आम्ही याविषयी 'ग्रंथालयांकडे पाहण्याचा दृष्टिकोण' या लेखात (पृ. १४२) प्रा. कर्णिक वास्तव परिस्थिती दर्शवितात पिढ्या न् पिढ्या ग्रंथ जाणीवा विकसित न होताच आपण जगत असतो, असे सांगून कर्णिक म्हणतात, 'आता हे सारे का होते? तर कोणाला त्याची निकडच वाटत नाही. निकड वाटली असली तर पालकांनी शाळेवर व सरकारवर दबाव आणून ग्रंथालये निर्माण करायला लावली असती.'' एकूणच समाजमनाची या विषयाबाबतची अनास्था अधोरेखित करणारा हा लेख महत्त्वाचा आहे. पुस्तकांतील लेखांचे वर्गीकरण लक्षात होऊनही हा लेख सुरुवातीस यावयास हवा होता असे वाटते. या लेख संग्रहात नियतकालिकातून पूर्वी प्रकाशित झालेले (व आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून प्रसारित झालेले भाषण ) एकोणीस लेख समाविष्ट आहेत. या एकोणीस लेखांची विभागणी कोशवाङ्मय, ग्रंथ-दुर्मिळ ग्रंथ, ग्रंथालय आणि ग्रंथसंस्कृती अशा चार वर्गात केली आहे.

**कोशवाङ्मय -**

या भागात आठ लेख आहेत. आपल्याकडील एकूणच शिक्षणपद्धतीत कोशांचे महत्त्व कोणत्याही टप्प्यावर विद्यार्थ्यांना नीट समजावून सांगितले जात नाही. यातील 'कोश हे शिक्षकांचे मित्र' हे आकाशवाणीवरील भाषण आहे. यात ज्ञानकोश, चरित्रकोश, शब्दकोश इ. कोश साहित्याचा आपल्या अध्यापनात शिक्षक कसा प्रभावी वापर करू शकतील याबद्दल, कर्णिकांनी अतिशय तपशीलात उदाहरणांसह मार्गदर्शन केले आहे. विविध विषयांवरील अशी अन्य

उदाहरणे कोश साहित्यांतून शोधून काढून प्रत्येक अध्यापकाने आपले अध्यापन ज्ञानाभिमुख केल्यास विद्यार्थ्यांतही संदर्भ शोध वृत्ती निर्माण करता येऊ शकते हे माहीत करून घेण्यासाठी शिक्षकांनी ग्रंथांलयाचा वापर वाढवावयास हवा.

याच भागात 'जिथे ग्रंथ कोंडले जातात. तिथे राष्ट्र कोंडले जाते' या शीर्षकाचा गॅझेटिअर्स (स्थलवर्णकोश किंवा दर्शनिका) संदर्भातील लेख आहे. ना. गो. चाफेकरांच्या 'बदलापूर' वरील मराठीतील पहिल्या स्थलवर्णन कोशाचा उल्लेख तर या लेखात आहेच, पण कोल्हापूर गॅझेटिअर संबंधातील चिंतनही महत्त्वाचे आहे. गॅझेटियर या शब्दाचा व्युत्पत्ती व अर्थापासून ते इतिहासापर्यंतचा धावता आलेख या छोटेखानी लेखात आलेला आहे. पहिल्या भागातील सर्व लेख ग्रंथपालांनी तर अवश्य वाचायलाच हवेत. त्यांच्या ग्रंथालय शास्त्राच्या पुस्तकी माहितीला किती परिमाणे असू शकतात हे त्यांना यातून जाणवेल.

'सिअर्स लिस्ट' वरील लेखाचा विषय ग्रंथालय शास्त्राच्या दृष्टीने व म्हणूनच ग्रंथपालांना विशेष महत्त्वाचा ठराव असा आहे. स्वतः कर्णिकांनी याबाबत विशेष असे केलेले चिंतन व विषय शीर्षके, वर्गांकाबाबत केलेले प्रयोग यामुळे याबाबत त्यांनी पृ. १०१ वर केलेल्या शिफारशी भाषा विकासासाठी उपकारक ठरतील अशा आहेत. मात्र हा संशोधन आराखडा हा स्वतंत्र ग्रंथाचा विषय आहे.

**ग्रंथ-दुर्मिळ ग्रंथ -**

या भागात तीन लेख आहेत. 'प्रवास पुस्तकाचा' या लेखामध्ये (पृ. १०३ ते ११३) मौखिक परंपरेपासून ग्रंथनिर्मिती व ग्रंथजगताकडून कागदविरहित ग्रंथापर्यंत ग्रंथाचा प्रवास कसा झाला, या प्रवासातील क्रांतिकारक टप्पे कोणते या विषयी महत्त्वाची माहिती येते. दुर्मिळ ग्रंथ या लेखात दुर्मिळतेच्या व्याख्येचा केलेला विचार, अ.का. प्रियोळकरांच्या कार्याचा उल्लेख महत्त्वाचा ठरतो. ग्रंथालयपासून कालबाह्य झालेले साहित्य बाद करण्यासाठी काही धोरण असावे लागते. त्या दृष्टीने या विषयावरील लेख ग्रंथालयात काम करणारांना विशेष मार्गदर्शक ठरावा.

**ग्रंथालये**

या भागातील चार लेखात प्रसार माध्यमे आणि ग्रंथालये हा लेख विशेष महत्त्वाचा आहे. तसाच मराठीचे माहितीकेंद्र या लेखातील माहिती अनेकांना नवीन वाटणारी ठरेल.

**ग्रंथसंस्कृती**

या भागात तीन लेख व एक कविता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ग्रंथप्रेम जगद्विख्यात आहे. या संदर्भात पृ. १५८ वर बाबासाहेबांनी प्राध्यापका बाबत व्यक्त केलेली मते आज ५०वर्षांनी देखील लागू पडतील. बाबासाहेबांच्या ग्रंथविश्वाचाही धावता परामर्श या लेखात आहे.

यातील 'स्वतःच्या घराइतकंच स्वतःचं पुस्तकही असायला नको का? ' हा प्रश्न विचारणारा लेख म्हणजे मराठी वाचन संस्कृतीपुढे धरलेलं मोठं प्रश्न चिन्ह आहे. 'राज्यामध्ये सुमारे बत्तीसशे पूर्णवेळ आणि अठराशे अर्धवेळ ग्रंथालय कर्मचारी आहेत. ते अक्षरशः वेठबिगारासारखे काम करतात; पण त्याचे कुणाल काहीच वाटत नाही.'' हे तळमळीने मांडलेले निरीक्षण मराठी माणसाने अंतर्मुख व्हावं या भावनेतून आलेला आहे. (पृ. १५५).

या लेखसंग्रहात शेवटी आलेली कविता अशीच अत्यंत महत्त्वाची आहे. लहान वयात वाचायलाच हवीत अशा ग्रंथांची एक यादी कर्णिक कवितेच्या माध्यमातून पुढे ठेवतात. 'खरंच सांगतो, ती वाचन उत्सुक गोड मुलं आहेत' हे कवितेचं शीर्षकच लक्ष वेधणारे आहे. अब्राहम लिंकनच्या पत्राप्रमाणे पोस्टर स्वरुपात ही कविता शालेय

आणि सार्वजनिक ग्रंथालयात सर्वांना दिसेल अशी लावली जायला हवी. मुलांचा व्यक्तिमत्त्व विकास करावयाचा असेल तर त्याने काय वाचावं हे सांगणारं हे प्रीस्क्रीपशन आहे.

**हे पुस्तक कोणासाठी -**

पुस्तकाच्या शीर्षक पृष्ठावर प्रमाणपत्र परीक्षेचे व पदवीचे ग्रंथालय शास्त्राचे विद्यार्थी व ग्रंथ संस्कृतीचे चहाते यांना हे पुस्तक उपयोगी असल्याचे म्हटले आहे. यात वाद नाहीच पण 'ग्रंथ संस्कृतीचे चहाते' नसणारे मुख्याध्यापक, शिक्षक व सर्व ग्रंथपाल, तसेच पालक (पाल्याचा वयोगट कोणताही असला तरी !) आणि ग्रंथविश्वातील सर्व लहान थोरांना हे पुस्तक मार्गदर्शक ठरू शकेल असे आहे. शासनाने तर प्रमाण पत्र परीक्षांसाठी हे पुस्तक अनिवार्य करावे.

लेखांची भाषा माहिती सादर करणारी, तरीही ओघ टिकवून ठेवणारी अशी आहे. मात्र यातील कोणता लेख कोणत्या नियतकालिकात व कधी प्रकाशित झाला होता याचा तपशील प्रत्येक लेखाच्या खालीच येणे आवश्यक होते. तसेच सदर लेख लिहिण्यासाठी कर्णिकांनी अनेक ग्रंथ वाचले, चाळले व अभ्यासले आहेत. त्या ग्रंथांची अकारविल्हे एकत्रित वा लेखवार सूची ही या पुस्तकाची गरज आहे. पुस्तकाचे प्रकाशन करणारी नवचैतन्य ही संस्था व तिचे प्रकाशन विश्वातील योगदान महत्त्वाचे आहे. या ग्रंथाची पुढील आवृत्ती काढताना काही त्रुटींचे निराकरण करावे ही अपेक्षा !

- ग्रंथ, ग्रंथालय, ग्रंथसंस्कृती - कर्णिक प्रदीप
- मुंबई, नवचैतन्य प्रकाशन, २००५.
- पृ. १६८ • मूल्य रु १२०/- फक्त

**- मोहन पाठक**

## डॉ. मूर्ती - नवे संचालक



विद्या प्रसारक मंडळाच्या डॉ. वा. ना. बेडेकर संशोधन व व्यवस्थापन शास्त्र संस्थेचे संचालक म्हणून डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांची नेमणूक करण्यात आली आहे. डॉ. मूर्ती, आर.ए. पोद्दार वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालयाचे माजी प्राचार्य असून प्रख्यात अशा जमनालाल बजाज व्यवस्थापद संस्थेचे संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. वाणिज्य शाखेतील निष्णात व पीएच्. डी. या पदव्या असणाऱ्या डॉ. मूर्ती यांचे पदव्युत्तर शिक्षण अमेरिकेतील स्टॅनफोर्ड या प्रख्यात विद्यापीठातून झाले आहे. 'क्रिमीनल लॉ' या विषयातील मुंबई विद्यापीठाची विधी शाखेतील पदवीही त्यांनी प्राप्त केली आहे.

व्यवस्थापन शास्त्रातील तज्ज्ञ व अर्थ आणि लेखापालनातील अधिकारी असणाऱ्या डॉ. मूर्ती यांची अनेक पुस्तके व शोधनिबंध प्रसिद्ध आहेत. सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील अनेक नामवंत संस्थांचे ते सल्लागार आहेत. यात वर्ल्ड बँकेसारखी महत्त्वाची संस्थाही आहे. जगभर प्रवास केलेल्या डॉ. मूर्ती यांनी देशातील व परदेशातील अनेक विद्यापीठातून व्यवस्थापन शास्त्रावर व्याख्याने दिली आहेत. व्यवस्थापनशास्त्र या विषयाचे मुंबई विद्यापीठाचे ते मान्यताप्राप्त मार्गदर्शक असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन केलेल्या अनेक विद्यार्थ्यांना निष्णात व पीएच्.डी. या पदव्या प्राप्त झालेल्या आहेत. डॉ. मूर्ती राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक पुरस्कारांचे मानकरी आहेत.

**साहित्य जगत**

# सुमेरु प्रकाशनाची दोन दर्जेदार पुस्तके

**१) मराठी वाङ्मयातील अभिजात संगीत -**

सुमेरु प्रकाशन (डी-६, राजहंस सोसायटी, टिळकनगर, डोंबिवली (पूर्व) ४२१२०१. जि. ठाणे) या नामवंत प्रकाशन संस्थेने १५.५.२००५ रोजी प्रकाशित केलेल्या 'मराठवाड्यातील अभिजात संगीत' (अर्थात देवगिरीची रागगाथा) या पुस्तकाच्या (पृ. २३२, मूल्य रु. २००/-) लेखिका आहेत अंजली मालकर (निरामय-५, परिमल हौसिंग सोसायटी, गारखेडा परिसर, औरंगाबाद-४३१००५;भ्रमणध्वनी : ९४२२७०७२००)

**अंजली मालकर -**

लेखिका अंजली मालकर यांचे संगीतातील प्रारंभिक शिक्षण औरंगाबादला सौ. तारा बसोले आणि श्री. मधुसूदन भावे यांच्याकडे झाले. पं. सी. आर. व्यास व डॉ. वीणा सहस्त्रबुद्धे, यशवंत क्षीरसागर यांच्याकडे झाले. डॉ. विकास कशाळकर यांच्याकडून संगीतातील उच्च शिक्षणाचे पाठ मिळाले. पुण्याच्या एस.एस.डी.टी. महाविद्यालयातून संगीताच्या पदव्युत्तर परीक्षेत त्या प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या. केंद्र सरकारची संगीत शिक्षणाची दोन वर्षाची असलेली शिष्यवृत्ती त्यांना मिळाली. कल्याण गायन समाज (कल्याण) गानवर्धन (पुणे) इ. गायन स्पर्धामध्ये त्यांना पारितोषिके मिळाली ! 'बरखा ऋतु आयी' 'प्रकाशयात्री कुसुमाग्रज रंगबसंत' अशा वैशिष्ठ्यपूर्ण प्रयोगांचे सादरीकरण त्यांनी केले. 'स्वरसेतू' (सं. डॉ. सौ. चारुशीला दिवेकर, अध्यक्ष, श्रीराम कल्चरल ट्रस्ट, २०१, बाबा होम्स को. ऑप. सो. प्लॉट नं. ३०७, नेरुळ, नवी मुंबई ४००६०७; फोन नं. ९५२२-२७७०८८९/२७७१५३२४) या त्रैमासिकातून व इतर संगीत विषयक मासिकांतून लेखन केलेले आहे. त्याची 'पिया' ही ध्वनीफित आणि सी. डी. प्रकाशित झाली आहे. औरंगाबाद येथील स.भू. कला व वाणिज्य महाविद्यालय आणि डॉ (सौ) इं.भा. पाठक महिला कला महाविद्यालयात त्या अध्यापन करतात.

**मराठवाड्यातील अभिजात संगीतः अर्थात देवगिरीची रागगाथा**

प्रस्तुत पुस्तकाची एकूण आठ प्रकरणे आहेत ती अशी : १) रागसंगीताचा सुवर्णकाळ २) कीर्तन संगीतातील रागविद्या ३) रागसंगीताची पंढरी : हैद्राबाद संस्थान ४) मराठवाड्याच्या रागसंगीताची राजधानी : औरंगाबाद जिल्हा ५) रागविद्येच्या प्रसारकांची भूमी : नांदेड जिल्हा ६) कीर्तन परंपरेला पाईक : बीड जिल्हा ७) नाट्यरंगी रंगला : परभणी जिल्हा आणि ८) संगीत चळवळीचा मानकरी : उस्मानाबाद जिल्हा.

सुप्रसिद्ध संगीतज्ज्ञ डॉ. विकास कशाळकर (पुणे) यांची अभ्यासू प्रस्तावना या पुस्तकास लाभली आहे.

मराठवाड्याचा सांगतिक इतिहास जाणून घेण्यासाठी लेखिका अनेक ठिकाणी फिरली आहे. पैठणला पोथ्या-पुराणांची बाड धुंडाळली भजनात-कीर्तनात ज्या जाऊन बसल्या. छोटी/मोठी ग्रंथालये पालथी घातली. आवश्यक माहितीपेक्षा अनावश्यक माहितीचे ओझही प्रचंड झाल तरीही अशा अनावश्यक माहितीच्या घनदाट जंगलातून वाट पुसत पुसत शक्य तितकी माहिती वाचकापर्यंत पोहोचविण्यांत त्यांनी जो संयम आणि तार्किकता पाळली, त्याबद्दल त्यांच् कौतुक करायला हवं.

कुठेही अवास्तव अतिरंजित न करता वास्तवाला धरुन लिखाण केल्यामुळे त्यांच्या पुस्तकांतली सत्यता पटायला लागते.''

''अण्णासाहेब गुंजकर, स.भ. देशपांडे यांच्या सारख्या संगीत तज्ज्ञांनी मराठवाड्यामध्ये जी गतकालीन सरस्वती गुप्त झाली होती तिचे पुनःदर्शन या पुस्तकात आहे. या पुस्तकातून मराठवाड्याच्या सांगितिक वैभवाचे जसे दर्शन होते तसेच आधुनिक संगीत प्रचारकांनी संगीताची गोडी लावण्यासाठी केलेल्या सातत्य पूर्ण प्रयत्नांची साक्ष पटते.''

''मराठवाड्यातल्या बहुतेक सगळ्या जिल्ह्यांचा प्रत्यक्ष प्रवास करुन तिथली सांगितिक माहिती प्रस्तुत पुस्तकांत देण्याचा प्रयत्न लेखिकेने केला आहे. त्याबद्दल त्याचे अभिनंदन व त्यांना शुभेच्छा !''

'मनोगतांत लेखिका म्हणते', मध्ययुगीन संगीताच्या इतिहासामध्ये श्रेष्ठ गायक गोपल नायक आणि संगीतज्ज्ञ अमीर खुस्त्रो यांचे सांगितिक योगदान हे शास्त्रीय संगीतात महत्त्वाचे मानले गेले आहे. तसेच पं. शारंगदेव लिखित 'संगीत रत्नाकर' ला भारतीय संगीतातला संदर्भ ग्रंथ म्हणून जनमान्यता मिळालेली आहे. गोपाल नायक आणि शारंग देव हे दोघेही मराठवाड्यातील देवगिरी म्हणजे आजच्या दौलताबाद परिसरात तेराव्या शतकात वास्तव्यास होते.'

तेराव्या शतकापासून विसाव्या शतकापर्यंतच्या मराठवाड्यांतील रागसंगीताच्या प्रवासाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न या पुस्तकात केलेला आहे. ललित कलांचा विशेषतः शास्त्रीय संगीता सारख्या प्रवाही श्राव्य कलेचा मागोवा घेणं सोप नाही. याची जाणीव सारखी होत होती. परंतु गुरुजनाचे मार्गदर्शन आणि ज्येष्ठ कलाकारांनी दिलेल्या प्रचंड प्रतिसादाच्या बळावर मी मार्गक्रम करू शकले. हा प्रवास आनंदमयी आणि तितकाच उद्‌बोधक झाला. डॉ. ब्रह्मानंद देशपांडे, डॉ. चंद्रकांत घाडेसर, ग्रंथपाल होळंबेसर, डॉ. प्रभाकर मोठे इ. माननीय व्यक्तींचे फार मोठे सहकार्य मला लाभले. त्याबद्दल त्यांना धन्यवाद .

'मराठवाड्यातील अभिजात संगीत' चा माहिती पूर्ण इतिहास सादर केल्या बद्दल लेखिका अंजली मालकर व प्रकाशक श्रेणिक दाते यांचे अभिनंदन.

**– शरद जोशी**
ग्रंथसारक


**आगामी परिषद**
**विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन**
आयोजित
## अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत्र
या विषयावरील चर्चासत्र
दिनांक : २७ व २९ ऑगस्ट २००५
अधिक माहितीसाठी आमच्या
www.vpmthane.org
या संकेतस्थळाला भेट द्या.


दिशा
{Z`_rV
dMM

## साहित्य जगत

# '... आणि धरणीकंप होत राहिला'

सुमेरु प्रकाशनानेच (दूरध्वनी क्र. ९५२५१ - २४०४१४९, २४३५९६८, ३०९३३१९) हे पुस्तक (पृ. २०४, रु. १८०/-) २५.३.२००५ या नामवंत प्रकाशन संस्थेने १५.५.२००५ रोजी प्रसिद्ध झालेलं आहे. लेखक आहेत. श्री. भालचद्र देशपांडे (४, जनकपूरी वसाहत, गारखेडा परिसर, औरंगाबाद-४३१००५)

लातूर - उस्मादाबाद जिल्ह्यातील किल्लारी-सास्तूरचा परिसर ३० सप्टेंबर १९९३ रोजी पहाटे हादरला. या दोन जिल्ह्यातील जवळपास ३८ गावे भुईसपाट झाली. अनेक पिढ्यांच्या प्रयत्नातून उभे राहिलेल्या गावांना दगड-मातीच्या ढिगाऱ्याचे स्वरुप आले. सात सेकंदाच्या हादऱ्याने ३८ गावांतील बारा हजार माणसे मेली. या भागातील नव्वद टक्के कुटुंबांना जीवितहानीचा फटका बसला. जगभरातील लोकांची सहानुभूती आणि माणसातील जगण्याच्या दुर्दम्य इच्छेच्या बळावर माणसांनी हा आघात पचवला.

भूकंपाने त्या माणसांचे भौगोलिक व भौतिक गज आमूलाग्र बदलले. पण माणसांच्या मानसिकतेत कसलाच बदल झाला नाही. भूकंपग्रस्तांची सामाजिक चौकट अभेद्य राहिली. उलट स्वार्थ, आत्मकेंद्रीवृत्ती, जात-पात धर्माचे अभिनिवेश वाढले. कदाचित जीवनाची असुरक्षितता तीव्रतेने जाणवल्यामुळे असे झाले असेल. पण त्यांतूनच सुरु झाली सामाजिक भूकंपाची कधीच न संपणारी एक मालिका.

पत्रकार आणि साहित्यिक असलेले श्री. देशपांडे यांनी हा किल्लारीचा भूकंप जवळून पाहिला. त्यांचे सूक्ष्म निरीक्षण आणि सहज सुलभ भाषेत सांगितलेली ही कहाणी हृदयाला भिडणारी आहे. भूकंपपूर्व आणि भूकंपानंतरच्या काळातील माणूस आणि मानवी समूहाच्या प्रवृत्तींचा ललित स्वरुपातील हा ऐतिहासिक दस्तावेज आहे. प्रत्येकाने तो जरुर वाचलाच पाहिजे.

**अरविंद जोशी कृत छोटी पुस्तिका 'आरोग्य मुद्रा'**

अरविंद जोशी हे आरोग्यविषयक लेखन करणारे एक लेखक आहेत. 'आरोग्य-मुद्रा' या नावाची एक पॉकेटसाईज पुस्तिका (पृ. १८, मूल्य रु.१०/-, प्रकाशिका - सौ. शोभा जोशी, गोडविंदा प्रकाशन, ६१५, नारायाण पेठ, पुणे -४११०३०, दूरध्वनी : ९५२०-२४३४७०२१) लिहिली आहे.

ते म्हणातात, 'आपले शरीर पंचमहाभूतांनी बनलेले आहे. आपल्या हाताला पाच बोटे आहेत. त्यांतील प्रत्येक बोटात एकेक महातत्त्व आहे. ते असे-अंगठा -अग्नितत्व, तर्जनी (अंगठ्याशेजारील बोट) वायुतत्व, मधले बोट -आकाशतत्व अनामिका (करंगळी शेजारील बोट) - पृथ्वीतत्व आणि करंगळी-जलतत्व'

बोटांच्या स्थितीला मुद्रा म्हणतात. त्या बऱ्याच प्रकारच्या आहेत. ज्ञानमुद्रा, वायुमुद्रा इ. नऊ प्रकारच्या मुद्रांची सचित्र माहिती या पुस्तिकेत आहे. त्या कशा कराव्यात व कोणकोणत्या आजारावर कोणकोणत्या मुद्रा कराव्यात ही माहिती त्यांनी या पुस्तिकेत दिलेली आहे. इतर औषधांबरोबर ह्या मुद्रा कराव्यात. त्याने आजार कमी होण्यास उपयोग होतो.' असे त्यांचे म्हणणे आहे. यापूर्वी त्यांनी 'शिवाम्बु कसे व का घ्यावे ? 'रंगकिरण चिकित्सा' 'पाणी औषध' Mudrass for Health, श्री स्वामी समर्थ कृपा सिद्ध होम, या छोट्या पुस्तिका लिहिलेल्या आहेत.

**- शरद जोशी** (ग्रंथप्रसारक)

# परिसर वार्ता

### डॉ. बेडेकर विद्यामंदिर, माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल

१९ फेब्रुवारी २००५ रोजी माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा घेतली गेली ह्या परीक्षेसाठी ३५ विद्यार्थी बसले होते. त्यातील सर्वच्या सर्व ३५ विद्यार्थी चांगल्या गुणांनी पास होऊन शाळेच्या माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल १००% लागला. ५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली त्यांची नावे खालील प्रमाणे -

१) ओजस गोहाड - ६वी

२) ऋचा कारखानीस - ७वी

३) मालविका मुळे - १६वी

४) विराज संघवी - २१वा

५) प्रियल नागरे - २२वा

शिक्षक - नीता शारदा, हरदीप कौर सुलार

### टिळक विद्यापीठ (गणित) निकाल - २००५

| इ. | परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | उत्तीर्ण झालेले विद्यार्थी |
|---|---|---|
| ५वी | २३ | २३ |
| ६वी | १६ | १६ |
| ७वी | १८ | १८ |

सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे

| | | |
|---|---|---|
| ५वी | अभ्यंकर आदित्य | ८९ |
| ६वी | देशपांडे अपूर्वा | ८९ |
| | प्रधान तेजल | ८९ |
| | जाधव कृतिका | ८९ |
| ७वी | मुळे मालविका | १०० |
| | सुतार शर्वरी | १०० |

### एम्. एम्. एस्. अभ्यासक्रम

तंत्र शिक्षण संचालनालयाने २००५-०६ या वर्षापासून डॉ. वा. ना. बेडेकर संशोधन व व्यवस्थापन शास्त्र संस्थेस एम्.एम्. एस्. अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता दिली आहे. या मान्यतेसाठी आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा विद्या प्रसारक मंडळाने पुरविल्या असून या मान्यतेमुळे मुंबई विद्यापीठांकडून विद्यार्थी या संस्थेकडे पाठविले जातील.

### प्राचार्य नायक - आंतरराष्ट्रीय परिषदेस उपस्थिती


डी.के. नायक

आंतरराष्ट्रीय हायड्रोजन उर्जातंत्र केंद्र हे इस्तम्बूल येथे स्थापन झाले असून १३ ते १५ जुलै २००५ या दरम्यान इस्तम्बूल (टर्की) येथे आंतरराष्ट्रीय हायड्रोजन (जलवायु) उर्जा मेळावा व प्रदर्शन भरविण्यात आले होते. भारतातून आमंत्रित करण्यात आलेल्या निवडक प्रतिनिधींमध्ये तंत्रनिकेतनाचे प्राचार्य नायक यांचा समावेश होता. या मेळाव्यात प्राचार्य नायक व तंत्रनिकेतनातील एक वरिष्ठ प्राध्यापिका डॉ. सौ. उषा प्रधान यांनी लिहिलेला 'स्टोरेज ऑफ हायड्रोजन इन नॅनोस्‌बस्' हा विषय प्राचार्य नायक यांनी सादर केला. वक्ते व मौखिक पद्धतीने ५०० निबंध या परिषदेत सादर केले गेले.

या परिषदेत विषयाच्या सद्यःस्थितीत अनुलक्षून हायड्रोजन पासून उर्जानिर्मितीचा तंत्रसंबंधात रुपरेषा चर्चिण्यात आले. टर्कीचे उर्जामंत्री डॉ. हिल्मी गुलेर व इस्तम्बूलचे महापौर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. सुमारे

३० देशातून १८०० प्रतिनिधी या परिषदेस आले होते.

प्राचार्य नायक यांचे 'दिशा' व मंडळाच्या घटकसंस्थाकडून विशेष अभिनंदन !

**वि.प्र. मंडळ तंत्रनिकेतनातील उज्वल यश परंपरा**



**पारितोषिक स्वीकारताना वैभव खरे.**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ या संस्थेने महाराष्ट्रातील लहान लहान खेड्यापर्यंत आपलं जाळं पसरवत तंत्रशिक्षणाचा प्रसार आणि प्रचार केला आहे. यंदाच्या वर्षी वेगवेगळ्या पदविका अभ्यासक्रमाद्वारे उन्हाळी २००५ साली उत्तीर्ण झालेल्या तृतीय वर्ष पदविका परिक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, १९ जुलै २००५ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता.

हा सत्कार राज्यमंत्री मा. ना. श्री. सुरेशरावजी शेट्टी (उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, पर्यटन व विशेष सहाय्य, महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला. या प्रसंगी तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य संचालक श्री. एन.बी. पासलकर, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे संचालक श्री. बी. पी. टाले आणि सचीव श्री. गु. भि. धनोकार तसेच रिलायन्स समूहाचे श्री. चैनी उपस्थित होते.

यंदाच्या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील, इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स या विभागात शिकणारा कु. वैभव केतन खरे, तृतीय वर्ष अभ्यासक्रमातून इलेक्ट्रॉनिक्स ग्रुप मधे संपूर्ण महाराष्ट्रातून प्रथम आला. पदविका अभ्यासक्रमात सिव्हिल, मेकॅनिकल, कॉम्प्यूटर, फार्मसी, इलेक्ट्रॉनिक्स असे विविध ग्रुप असतात. यातील सर्वात मोठा इलेक्ट्रॉनिक्स ग्रुप मानला जातो. वैभव खरेचे हे यश या दृष्टीने वि.प्र. मंडळाच्या कारकिर्दीत मानाचा तुरा खोवणारे आहे. वैभवच्या या यशाबद्दल सुवर्णपदक, रोख रक्कम रु. ५०००/-, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्रक देऊन सत्कार करण्यात आला. आपल्या यशाचे श्रेय, या समारंभातील भाषणात, त्याने आपले आई-वडील, प्रचार्य श्री. डी. के. नायक, इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख, प्रा. किर्ती आगाशे तसेच तंत्रनिकेतनातील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांना दिले. कोणत्याही बाह्य शिकवणी वर्गाला न जाता, तीनही वर्ष तंत्रनिकेतनातील शिक्षकां वरील विश्वास आणि स्वतःची सातत्याने केलेली मेहनत यांच्या सहाय्याने त्याने हे यश संपादन केले. पुढील पदवी अभ्यासक्रमासाठी त्याचा व्ही.जे.टी.आय. या मान्यवर संस्थेत प्रवेश मिळाला आहे.

मागील वर्षी वि.प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनातील इलेक्ट्रॉनिक्स पॉवर सिस्टिम या विभागातून कुमार श्रेयस झिंगरे हा विद्यार्थी संपूर्ण राज्यात प्रथम आला होता.

यशाची ही उज्वल परंपरा सातत्याने राखणाऱ्या विद्या प्रसारक मंडळ सदस्यांचे, प्राचार्यांचे, विभाग प्रमुखांचे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन!

-संकलीत

# ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात अभ्यासक्रम २००४-२००५
## संशोधन प्रकल्प यादी

(२००४-२००५ या शैक्षणिक वर्षात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठच्या निष्णात परीक्षेसाठी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील केंद्रात सादर झालेल्या संशोधन प्रकल्पांची यादी)

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | प्रकल्पाचे नाव | मार्गदर्शक |
|---|---|---|---|
| १ | रेश्मा गोविंद तोंडलेकर OP 1600076 | ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील ग्रंथालयातून वाचकांना दिल्या जाणाऱ्या सेवा.'' | महेश दळवी |
| २ | कु. संगिता सुरेश दिवे OP 1600078 | 'ललित' मासिकाचे सूची कार्यातील योगदान | प्रा. सतिश डोंगरे |
| ३ | सरिता राम पवार OP 1600079 | 'सी.एच्.एम. महाविद्यालयाच्या' ग्रंथालयातील भाषा व साहित्य विषयातील संदर्भसाहित्याचे मूल्यमापन''. | प्रा. मोहन पाठक |
| ४ | सरिता राम पवार OP 1600085 | 'विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात येणाऱ्या अभ्यास विषयक नियतकालिकांचा वापर : एक अभ्यास''. | प्रा. मोहन पाठक |
| ५ | सौ. अर्पणा महेश म्हात्रे OP 1600084 | ''सार्वजनिक वाचनालय आणि जिल्हा ग्रंथालय अलिबाग एक सर्वकष अभ्यास'' | प्रा. सतिश डोंगरे |
| ६ | वैशाली रामचंद्र होवाळे OP 1600091 | ''विक्रोळीतील निवडक माध्यमिक शालेय ग्रंथालयांचा अभ्यास'' | श्री. नारायण बारसे |
| ७ | अनिता मुरलीधर दांगट OP 1600077 | '' शालेय ग्रंथालयांतील उपक्रम'' | डॉ. द. ना. फडके |
| ८ | कु. स्मृती महादेव जोशी OP 1600075 | '' श्री. वसंत सावे यांचे ग्रंथालय क्षेत्रातील योगदान'' | सौ. चित्रलेखा चितळे |
| ९ | कु. स्मृती महादेव जोशी | '' प्रा. एम.के. नायडू यांचे ग्रंथालय क्षेत्रातील योगदान'' | सौ. चित्रलेखा चितळे |
| १० | सौ. संगिता मिलिंद प्रधान OP 1600381 | ''ठाणे शहरातील तीन निवडक शालेय ग्रंथालयाचे व्यवस्थापन : एक अभ्यास '' | डॉ. प्रकाश ग. करमरकर |
| ११ | श्री. शिरीष भालचंद्र शेटे OP 1600088 | ''महाविद्यालयीन ग्रंथालयातून घेतली जाणारी ग्रंथप्रदर्शने : एक अभ्यास '' | प्रा. महेश दळवी |
| १२ | सौ. अनघा सुनील मोडक OP 1600083 | '' ग्रंथालय मित्र मंडळाच्या माध्यमातून सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास''. | डॉ. द. ना. फडके |
| १३ A | प्रीती देवदास जाधव | ज्ञानसाधना महाविद्यालयातील वाचकांच्या वाचन-विषयक अभिरुचीचा अभ्यास. | डॉ. प्रकाश ग. करमरकर |
| १४ | संजय सकपाळ OP 1600089 | ग्रंथालयीन आज्ञावलींचा तैलनिक अभ्यास CDS/ISIS, SOUL & Lib.-Suite | डॉ. प्रकाश ग. करमरकर |
| १५ | सौ. सुधा पाटील OP 1600081 | केळकर ट्रस्टचे, विनायक गणेश वझे महाविद्यालय, मुलुंड येथील वाचकांचे प्रशिक्षण : एक अभ्यास | डॉ. हिंदुराव वायदंडे |
| १६ | कु. लता वायकर OP 1600086 | 'विद्या प्रसारक मंडळ, ठाणे संचलित महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचकांचा गरजा : एक अभ्यास''. | डॉ. हिंदुराव वायदंडे |
| १७ | कु. लता वायकर OP 1600082 | ठाणे शहरातील महाविद्यालयीन ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह विकास धोरण : एक अभ्यास''. | डॉ. हिंदुराव वायदंडे |
| १८ | जगदीश वसंत पाटील OP 1600082 | रायगड जिल्ह्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या ग्रंथालयाचा अभ्यास''. | डॉ. द. ना. फडके |

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

(स्थापना : १ ऑगस्ट १९३५)

## विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्था

१) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मराठी माध्यम)

२) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा

३) के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय

४) बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

७) वि.प्र.मंडळाचे टी. एम्. सी. विधी महाविद्यालय

६) वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतन

७) डॉ. वा. ना. बेडेकर संशोधन व व्यवस्थापन अभ्यास संस्था

८) प्रगत अभ्यास केंद्र

## उपक्रम

१) भावे राष्ट्रीय व्याख्यानमाला

२) दिशा व्यासपीठ

३) डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यान

४) १ ऑगस्ट विद्या प्रसारक मंडळाचा वर्धापन दिन

५) नारळीपौर्णिमा - संस्कृत दिन

६) ५ सप्टेंबर, दिक्षांत समारंभ

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिंटर्स, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ येथून प्रकाशित केले.